
# माणूस

शनिवार । १२ ऑगस्ट १९७८ । ७५ पैसे



नगर जिल्ह्यातील सुमारे ७० गावातून जनमतकौल पत्रिकांचे काम करणाऱ्या एका कार्यकर्त्याने पत्रिकांसोबत पाठविलेल्या आपल्या अहवालात लिहिले आहे –

या जनमत कौलात ज्यांनी आपली मते दिली त्यात समाजाच्या सर्व थरांचे प्रतिनिधित्व आहे असे बिनदिक्कतपणे म्हणावे लागेल. डॉक्टर, प्राध्यापक, प्राथमिक–माध्यमिक शिक्षक, विविध पक्षीय राजकीय कार्यकर्ते, तसेच शेतकरी, महाविद्यालयीन विद्यार्थी, स्त्री कार्यकर्त्या, सुशिक्षित बेकार, मजूर . . . . सर्व थरातून उत्साहाने काम झाले . . . .

**या कामाचा आढावा पुढील अंकी**

## पुढील अंक

## जनमत कौल विशेषांक

**किंमत । एक रुपया**

# 15 ऑगस्ट

## हर्षोल्हासाचा दिवस!

आमची मुल्यें आणि आदर्शासाठीं झटण्याचा, पुनर्संकल्प करण्याचा दिवस.

## आज आम्हाला आठवण होते:

— महात्मा गांधी यांच्या नेतृत्वाखालीं आम्ही स्वातंत्र्यासाठीं दिलेल्या ऐतिहासिक संग्रामाची,

— आमच्या कोटयावधि देशबांधवांनी केलेल्या त्यागाची आणि भोगलेल्या कष्टाची,

— स्वातंत्र्याची जोपासना, देशाची एकात्मता आणि आर्थिक विकासासाठीं केलेल्या भक्कम पाया उभारणीची,


## आज आम्ही पुन: संकल्प करतो:

— आम्ही देशातून बेकारी, रोगराई आणि निरक्षरता याचा नायटाट करूं,

— 5 लक्ष 76 हजार गावांतून राहणाऱ्या लोकांसाठीं, पिण्याचे पाणी, आरोग्य रक्षण, शिक्षण, आणि रस्तें इत्यादी किमान गरजा पूर्ण करूं,

... देशातील दुर्बल आणि मागास वर्गांना, समान सहकारी म्हणून देशाच्या सामाजिक आणि आर्थिक विकास कार्यात सहभागी करूं.

**स्वातंत्र्याच्या या 31 व्या वर्धापन दिनी गांधीजींच्या स्वप्नातील भारत निर्माण करण्याचा आणि प्रत्येक डोळ्यातील अश्रू पुसण्याचा आपण निर्धार करूं या.**



davp/78/212

साप्ताहिक माणूस

वर्ष अठरावे–अंक अकरावा
१२ ऑगस्ट १९७८
मूल्य ७५ पैसे

# राज्यकर्त्यांनी दिलेले वचन मोडू नये

श्री. ग. मा.

विद्यापीठाचे नाव बदलण्यावरून मराठवाड्यात लोकक्षोभाचा जो भडका उसळला तो दुर्दैवी व हानीकारक असला तरी अगदी अनपेक्षित होता, अचानक उद्‌भवला असे म्हणता येणार नाही. दलित पँथर्सची चळवळ महाराष्ट्रात सुरू झाल्यापासून तिची वाटचाल या दिशेने सुरूच होती. सहकार्य आणि सामंजस्य यापेक्षा विरोध आणि विद्रोह यावर या चळवळीची सर्व उभारणी झाली. दलितांच्या शैक्षणिक–आर्थिक विकासाचे विविध उपक्रम हाती घेऊन दलित व सवर्ण यातील दरी कमी करण्याचा विधायक मार्ग या चळवळीने नाकारला. लढा व संघर्ष यावर भर दिला. गौतम बुद्ध व त्याचा धर्म याशिवाय गेल्या दोन–अडीच हजार वर्षांची सर्व भारतीय–हिंदू परंपरा नष्ट करणे हा या चळवळीचा उद्‌घोषित उद्देश ठरला. ही परंपरा मानणाऱ्या बहुसंख्य सवर्ण समाजाची श्रद्धास्थाने दुखविणे, त्यावर हल्ले चढवणे, रामायणासारखे ग्रंथ जाळणे, ज्ञानेश्वरी वर्गात शिकवायलाही हरकत घेणे, हे सर्व प्रकार पुढे चळवळीत ओघानेच आले. हिंदू परंपरा मानणारा समाज हा दलित पँथर्स व तत्सम चळवळींचा शत्रू क्रमांक एक ठरला व जाणीवपूर्वक या शत्रू क्रमांक एकला डिवचून, ठेचून नाहीसा करण्यासाठी लेखणी व वाणी यांचा मनसोक्त वापर करण्यात आला. सामाजिक मानसशास्त्राची तोंडओळख असणारा कॉलेजविद्यार्थीही सांगू शकला असता, याची परिणती कशात होणार ते. शेवटी विद्यापीठ नामांतरासारखा एखादा प्रश्न प्रतिष्ठेचा बनतो-बनविला जातो आणि साचलेले रागद्वेष उफाळून येतात, चळवळी भडकतात. ४८ साली गांधीखून हे निमित्त होते. महाराष्ट्रात दंगली उसळल्या त्यांच्या मुळाशी ब्राह्मणांवरचा बहुजनसमाजाचा पिढ्यानुपिढ्या साचत आलेला राग, हे कारण होते. गेल्या ३०–४० वर्षात दलितांमधील बौद्धसमाज डॉ. आंबेडकरांच्या नेतृत्वामुळे व अंगच्या गुणांमुळे इतर दलितांपेक्षा विशेष पुढारला. सत्तेत तो भागीदारीही मागू लागला. बहुजनसमाजाला हे मानवणे कसे शक्य होते ? यात भर पडली दलित पँथर्सच्या प्रक्षोभक कृत्यांची, वक्तव्यांची. आळंदीला सुरुंग पेरला गेला. कुठेतरी भडका, उद्रेक अटळ होता. यापुढे असे उद्रेक टाळायचे असतील तर दलित पँथर्स व त्यांचे सहप्रवासी यांनीही आपल्या भूमिकेचा फेरविचार करण्याची तयारी ठेवायला हवी. सत्तेचा वाटा मागणे, प्रयत्नपूर्वक तो मिळवणे यात गैर काहीच नाही. प्रश्न फक्त मार्गाबद्दलचा आहे. गेल्या दोन–अडीच हजार वर्षांची परंपरा संपूर्णपणे नाकारून, उच्छेदून हा सत्ता व संपत्तीचा वाटा पँथर्स व त्यांचे सहकारी मिळवू पाहत आहेत. ही संघर्षाची वाट आहे, हळुहळु एकाकी पडत जाण्याचा धोकाही यात अंतर्भूत आहे. मराठ-

संपादक
श्री. ग. माजगावकर
साहाय्यक
दिलीप माजगावकर
सौ. निर्मला पुरंदरे
▫
वार्षिक वर्गणी :
चाळीस रुपये
▫
प्रकाशित लेख, चित्रे इत्यादींबाबतचे हक्क स्वाधीन. अंकात व्यक्त झालेल्या मतांशी चालक सहमत असतीलच असे नाही.
▫
राजहंस प्रकाशन संस्थेच्या मालकीचे हे साप्ताहिक संस्थेतर्फे मुद्रक व प्रकाशक श्री ग. माजगावकर यांनी साप्ताहिक मुद्रण, १०२५ सदाशिव, पुणे येथे छापून तेथेच संस्थेच्या कार्यालयात प्रसिद्ध केले.
▫
साप्ताहिक माणूस
१०२५ सदाशिव पेठ,
नागनाथ पाराजवळ
पुणे ४११ ०३०
▫
दूरध्वनी : ४४३४५९
▫

वाड्यात चांभार, मांग इत्यादी इतर दलित जातींचाही या विद्यापीठ आंदोलनांत पँथर्सना पाठिंबा लाभू नये हे कशाचे द्योतक आहे ? हा डॉ. आंबेडकरांच्या कार्याचा विस्तार की संकोच ? नामांतरापेक्षाही अधिक महत्त्वाचा प्रश्न हा आहे–विद्रोह की एकात्मता ? आणि एकात्मता हे अंतिम उद्दिष्ट असेल, साध्य असेल तर साधनांची जुळवाजुळवही तदनुकूल असायला हवी. तुटेपर्यंत ताणण्यात अर्थ नाही. कारण शेवटी तुटून तरी जाणार कुठे ? आंबेडकरांनाही एकात्मतेचा मार्गच श्रेयस्कर वाटत असावा. नाहीतर त्यांनी बौद्धधर्म स्वीकारण्याऐवजी दुसराच एखादा पर्याय नसता का स्वीकारला ?

□

दलित पँथर्स व त्यांचे सहप्रवासी आपल्या विद्रोहवादी भूमिकांचा फेरविचार करोत न करोत. शासनाने मात्र आपल्या नामांतर निर्णयाचा फेरविचार करणे योग्य ठरणार नाही. याबाबत मुख्यमंत्री श्री. पवार यांनी केलेला खुलासा पटण्यासारखा नाही. विधानसभेत एकमताने नामांतराचा ठराव संमत झाला. त्याप्रसंगी मुख्यमंत्र्यांनी ठरावाच्या बाजूने भाषणही केले. मग आता शासनाचा निर्णय झालेला नाही असे म्हणण्यात काय अर्थ आहे ? विधानसभा, मुख्यमंत्री, मंत्रिमंडळाचे सर्व सदस्य यांनी एकमुखाने घेतलेला निर्णय म्हणजे जाहीररीत्या दिलेले वचन आहे. हे वचन कायद्यात रूपांतरित करावयाचे हेही कालपरवापर्यंत ठरलेले होते. अद्याप कायदा झाला नसेलही. पण ही केवळ तांत्रिक बाब आहे. वेळेचा प्रश्न आहे. ही ढाल पुढे करून नामांतर निर्णय अंमलात न आणणे, आवश्यक त्या कायद्यात या निर्णयाचे रूपांतर न करणे म्हणजे सर्व राज्यकर्त्यांनी एकमुखाने दिलेले वचन मोडणे किंवा परत घेणे होय. वचन देण्यापूर्वी आपल्या भागातील जनतेच्या या प्रश्नासंबंधीच्या भावना किती तीव्र आहेत याची आठवण निदान मराठवाड्यातील लोकप्रतिनिधींना तरी व्हायला हवी होती. पण सगळ्याच पक्षांचे सगळेच लोकप्रतिनिधी दादांचे सरकार पाडण्यात आणि पवारांचे घडवण्यात इतके दंग होते, की या स्फोटक परिस्थितीकडे लक्ष पुरवायला कुणालाच सवड नव्हती. तितकी ती महत्त्वाचीही वाटत नव्हती. शिवाय पुरोगामीपणाचे एखादे बिरूद नव्या सरकारला पदरचे काही खर्च न करता झटपट मिरवता येण्याची संधी लाभत असेल तर ती कोण वाया जाऊ देईल ? सवंग लोकप्रियतेचे 'घी' त्यावेळी सगळ्यांनी पाहिले, नंतर बडगा आल्यावर पळापळ सुरू झाली. एस्. एम्. जोशी यांनी तरी निर्णयावर ठाम असायला हवे होते. पण तेही 'फेरविचाराची संधी द्या' अशी रदबदली करते झाले. पवारांचा तांत्रिक मुद्दा किंवा एस्. एम्. जोशी यांची रदबदली या आता पळवाटा किंवा माघारीच्या खुणा आहेत. निर्णय योग्य की अयोग्य, जनतेच्या भावना काय आहेत याचा विचार सुरुवातीलाच व्हायला हवा होता. आता काढता पाय घेणे नवीन मंत्रिमंडळाला मुळीच शोभादायक नाही. उलट आपले पुरोगामित्व सिद्ध करण्याची एक चांगली संधी नवीन मंत्रिमंडळासमोर चालून आलेली आहे. या संधीचा लाभ घेणार की पुरोगामी 'डोलणे' वाया जाऊ देणार ? आपलेच 'बोलणे' फोल ठरवणार ?

□

यानंतर मुंबई विद्यापीठाच्या नामांतराचा प्रश्न ! शिवाजी, टिळक, फुले, आंबेडकर आणि सावरकर – महाराष्ट्राने हे पंचायतन. पंचायतनातल्या चौघांची नावे विद्यापीठांना दिली गेलीच आहेत. पाचवे सावरकरांचे नाव बाकी आहे. ते मुंबई विद्यापीठाला द्यावे अशा सूचना वृत्तपत्रातून पुढे येऊ लागलेल्या आहेत. व्यक्तिनामे नको असतील तर कुणाचीच नकोत. चौघांची चालली तर पाचवेही का नको ! फरपट होऊ द्यायची नसेल तर एकदाच काय ते यासंबंधीचे, तर्कबुद्धीला पटू शकणारे निश्चित धोरण, पुरोगामी म्हणवणाऱ्या महाराष्ट्र शासनाने जाहीर करून ठेवलेले बरे.

□


**तीन राजहंस प्रकाशने**

१०२५ सदाशिव, पुणे ४११ ०३०

**आणि ड्रॅगन जागा झाला**
अरुण साधू । चवदा रुपये

**फिडेल, चे आणि क्रांती**
अरुण साधू । सात रुपये

**पूर्णिया**
अनिल अवचट । सहा रुपये

राजधानी दिल्ली । प्रतिनिधी

# सामाजिक अशांततेचा वाढता उद्रेक

विल्लुपुर, औरंगाबाद आणि रोहटक या देशाच्या निरनिराळ्या भागांमध्ये असलेल्या गावांमध्ये तसे काहीच साम्य नाही; परंतु गेल्या आठवड्यात तेथे अशा काही घटना घडल्या की त्यामुळे केवळ सत्ताधारी पक्षानेच नव्हे तर विरोधी पक्षांनीही व्यथित व्हावे अशी परिस्थिती निर्माण झाली. म्हणूनच पंतप्रधान मोरारजी देसाई यांनी संसदेतील सर्वपक्षीय नेत्यांची बैठक बोलावून, देशात सर्वत्र शांतता आणि सुव्यवस्था निर्माण करण्याच्या प्रश्नाला अग्रक्रम देण्याची आवश्यकता विशद केली. कारण या दंगलीमुळे केवळ खाजगी आणि सरकारी मालमत्तेचेच नुकसान झाले असे नव्हे तर सामाजिक अभिसरणाच्या अत्यंत अवघड प्रक्रियेवरच आघात झालेला आहे. सर्वधर्मसमभावाची सहिष्णुतेची आणि दुर्बल घटकांना न्याय मिळवून देण्याची भाषा बोलली जात असताना हा सर्व वरपांगी देखावा आहे, अशी जर समाजघटकांची समजूत दृढ झाली तर अल्पावधीतच सामाजिक तणाव उग्र रूप धारण करण्याचा धोका सत्ताधाऱ्यांप्रमाणे विरोधी पक्षनेत्यांनाही दृष्टीआड करता येणार नाही. कारण आजचे विरोधी पक्ष केव्हा सत्तारूढ होतील याची शाश्वती न देण्याइतकी राजकीय परिस्थिती अस्थिर झालेली आहे. म्हणून आपल्या पक्षाचे घोडे पुढे दामटण्याचा प्रयत्न करण्याऐवजी या समस्येची उकल कशी करता येईल, याविषयी विचारविनिमय होणे अगत्याचे आहे.

अर्थात अशा प्रयत्नांना इंदिरा काँग्रेसकडून फारसा प्रतिसाद मिळेल अशी शक्यता कमी आहे. म्हणूनच विल्लुपुरम् येथील अशांत परिस्थितीसंबंधी चर्चा करण्यासाठी मोरारजीभाईंनी बैठक बोलाविलेली असताना इंदिरा काँग्रेसचे सी. एम्. स्टीफन यांनी तेथे संसदसदस्यांचे शिष्टमंडळ धाडण्याचा आग्रह धरला होता; परंतु इतर विरोधी पक्षांनी त्या सूचनेचा पाठपुरावा न केल्यामुळे स्टीफन यांना आपला आग्रह पुढे रेटता आला नाही; पण त्या पक्षाने संसदेत मोरारजी–चरणसिंग पत्रव्यवहाराचे निमित्त करून जे अडवणुकीचे धोरण स्वीकारले आहे आणि 'भारत वाचवा'ची जी घोषणा दिलेली आहे त्यावरून त्या पक्षाकडून शांततेला चूड लावण्याचाच खटाटोप केला जाईल असे मानायला भरपूर आधार आहे.

इंदिरा काँग्रेसचे नेते कोणता पवित्रा घेतात हा मुद्दा, विल्लुपुरम्, औरंगाबाद आणि रोहटक येथे ज्या घटना घडल्या त्या संदर्भात महत्त्वाचा नाही. महत्त्वाचे आहे ते हे की, वातावरण चटकन किती पेटते हे लक्षात घेऊन शासनाकडून तातडीने उपाय योजिले जाणे. विल्लुपुरम् येथील घटना या दृष्टीने खूप बोलकी आहे. तेथल्या एका भाजीविक्याने एका हरिजन तरुणीची छेड काढल्यामुळे हरिजन गावकऱ्यांनी त्या भाजीविक्याला मारहाण केली. या मारहाणीच्या निषेधार्थ गावातील व्यापाऱ्यांनी हरताळ पाळला, तेव्हाच हे प्रकरण एवढ्यावर मिटणार नाही हे जिल्हा पातळीवरील अधिकाऱ्यांना सुचावयाला हवे होते; परंतु परिस्थिती स्फोटक होईपर्यंत ते स्वस्थ बसले. त्यामुळेच भाजीविक्याचा गैरवर्तनाबद्दल निषेध करण्याऐवजी त्याच्यावर झालेल्या मारहाणीचे निमित्त पुढे करून विल्लुपुरम् येथील सवर्णांनी हरिजनांच्या वस्तीवर हल्ला चढविला आणि त्यांच्या दोनशे झोपड्या जाळून टाकल्या. या वेळी झालेल्या दंगलीत जे पंधरा जण मरण पावले त्यात हरिजनांची संख्या अधिक आहे. त्यामुळे साहजिकच हरिजनांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले असून, आपल्याला शासनाकडून सुरक्षित जीवनाचे आश्वासन मिळेल की नाही, अशी शंका बळावली आहे. तामीळनाडूचे मुख्यमंत्री एम्. जी. रामचंद्रन यांनी विल्लुपुरम् येथील घटनेची न्यायालयीन चौकशी करण्याचे ठरविले आहे. या कार्यासाठी नियुक्त झालेले सेवानिवृत्त न्यायाधीश सदाशिवम् विल्लुपुरम् येथील दोन्ही समाजगटांमधील कार्यकर्त्यांना भेटून प्रत्यक्षामध्ये काय घडले याची माहिती गोळा करतील आणि तिच्या आधारे पुढील कारवाईसंबंधी सरकारला शिफारस करतील; परंतु हा सगळा प्रकार इतका विलंबाचा असतो की त्यामुळे आपद्ग्रस्तांचा चौकशीसमितीवरील विश्वासच उडून जातो. म्हणून विल्लुपुरम्मधील ज्या हरिजनांना निराधार व्हावे लागले आहे, त्यांच्या पुनर्वसनाची तातडीने व्यवस्था व्हावयास हवी. त्याचप्रमाणे इतर गावांमध्ये विल्लुपुरम्चे प्रतिध्वनी उमटणार नाहीत, इकडेही जागरूकतेने लक्ष दिले पाहिजे.

औरंगाबादमध्ये जी दंगल उफाळून आली आणि साऱ्या मराठवाडाभर चटदिशी पसरली तिच्यामागचे कारण मात्र थोडेसे वेगळे आहे. सवर्ण आणि हरिजन यांच्यातीलच तो संघर्ष असला तरी त्यात भावनात्मक आग्रहाचा भाग अधिक आहे. औरंगाबाद येथील मराठवाडा विद्यापीठाला डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे नाव देण्याची मागणी तेथील दलित समाज गेल्या काही वर्षांपासून करीत आलेला आहे. दलित समाजाची अस्मिता जागृत करण्याचे आणि सामाजिक अन्यायाविरुद्ध झुंज देण्याची प्रेरणा निर्माण करण्याचे कार्य डॉ. आंबेडकरांनी केले, याबद्दल वादच नाही. त्यामुळे दलित समाजाला त्यांच्यासंबंधी विशेष आदर आणि आत्मीयता वाटणे अगदी साहजिक आहे. मराठवाडा विद्यापीठाला त्यांचे नाव द्यावे अशी जी मागणी पुढे आली ती त्या आदरातूनच. डॉक्टरसाहेबांनी औरंगाबाद येथे मिलिंद एज्युकेशन सोसायटी काढली, म्हणूनच ते शहर महाराष्ट्रातील एक प्रमुख शिक्षणकेंद्र झाले.

हे सारे मान्य करूनही औरंगाबाद शहर म्हणजे संपूर्ण मराठवाडा नव्हे, याची जाणीव दलित-नेत्यांनी बाळगली असती तर या वादाला आता जे जातीय स्वरूप आलेले आहे ते टाळता आले असते. मराठवाड्याची अशी सांस्कृतिक विशेषता आहे. तिचे जतन आणि संवर्धन करण्याचे कार्य ज्यांनी केले त्यांच्यासंबंधी तेथील जनतेला विशेष

अगम्य वाटते. त्यामुळे मराठवाडा विद्यापीठाचे नामांतर करायचेच असेल तर संपूर्ण मराठवाड्याशी ज्यांचे नाव निगडित झालेले आहे अशांपैकी एका व्यक्तीची निवड करावयास हवी, असे काही लोकांचे म्हणणे आहे आणि त्यातील तथ्य, तटस्थ वृत्तीने विचार केला तर दलित-नेत्यांनाही जाणवायला हरकत नाही. डॉ आंबेडकरांच्या जीवन-कार्याबद्दल ज्यांच्या मनात नितांत आदर आहे अशाही काही व्यक्ती नामांतराच्या विरोधात उभ्या आहेत. ही वस्तुस्थिती कशी नाकारता येईल ?

हे सगळे माहीत असतानाही महाराष्ट्रातील लोकप्रतिनिधींनी विधिमंडळात नामांतराच्या प्रस्तावाचा एकमताने पुरस्कार केल्यामुळे एकदम मराठवाडा पेटला. हा प्रस्ताव मराठवाड्यातील अनेक लोकप्रतिनिधींना मंजूर नव्हता; परंतु आपण जर विरोध केला तर आपल्यावर कोणता आरोप करण्यात येईल हे माहीत असल्यामुळे ते गप्प बसले. विधिमंडळात जो शिफारसवजा प्रस्ताव संमत करण्यात आला तोही तडजोडीच्याच स्वरूपाचा आहे. डॉ. आंबेडकर यांच्या समवेत मराठवाडा हे नावही नामांतर-सूचनेमध्ये अंतर्भूत करण्यात आले. अशा तऱ्हेची तडजोड विरोधक आणि समर्थ या दोघांच्याही दोषाला कारणीभूत ठरते. औरंगाबाद येथे घडलेल्या घटनांचे पडसाद, मराठवाड्याची सीमा ओलांडून नागपूरपर्यंत पोहोचावेत यावरून या भावनात्मक आग्रहामागची तीव्रता आणि तणाव किती खोलवर रुजलेले आहेत, हेच कळून येते पंतप्रधान मोरारजी देसाई यांनी बोलाविलेल्या सर्वपक्षीय संसदसदस्यांच्या बैठकीमध्ये विल्लुपुरम्संबंधी जेवढी सविस्तर चर्चा झाली तेवढी मराठवाड्यातील दंगलीसंबंधी झालेली नसली तरी तेथील परिस्थितीच्या संबंधात काही सदस्यांनी आपले विचार व्यक्त केले. कारण विल्लुपुरम्प्रमाणे ही दंगल अत्याचारातून उद्भवलेली नसली तरी ती एका शहरापुरती किंवा लगतच्या काही खेडेगावांपुरतीच मर्यादित राहिलेली नाही. संयुक्त महाराष्ट्राच्या आंदोलनाच्या काळात जसा लोकक्षोभ अगदी खालच्या स्तरापर्यंत पोहोचलेला होता तसेच मराठवाड्यापुरते या वेळी घडलेले आहे आणि म्हणूनच विधिमंडळाच्या शिफारशीबाबत सरकारने अद्याप निर्णय घेतलेला नाही, असा नवे मुख्यमंत्री शरद पवार यांना खुलासा करावा लागला. विधिमंडळाची शिफारस नाकारणेही प्रशस्त दिसत नाही आणि लोकमताला शांत करणेही जमत नाही अशा पेचात महाराष्ट्राचे नवे सरकार सापडलेले आहे. वसंतदादा पाटील यांचे मंत्रिमंडळ गडगडल्यामुळे ज्यांना सत्तास्थानांपासून दूर व्हावे लागले अशी मंडळी अगदीच स्वस्थ बसलेली असतील असे कोणीच मानीत नाही नामांतराचा प्रस्ताव त्या मंडळींना मनापासून मान्य असेल असेही नाही; परंतु दंगल धुमसत रहावी म्हणून त्यांनी काही गटांना हाताशी धरण्याचा खेळ सुरू केला असला तर नव्या सरकारची अधिकच पंचाईत होणार आहे.

विल्लुपुरम् आणि औरंगाबाद येथील अशांतता हाताळताना शासकीय यंत्रणेची अकार्यक्षमता दिसून आली तर रोहटक येथल्या प्रकारात शासकीय अरेरावीचा प्रत्यय आला. तेथल्या वैद्यकीय महाविद्यालयातील विद्यार्थी आणि डॉक्टर यांनी आपल्या काही मागण्यांसाठी आंदोलन सुरू केल्यानंतर ते मोडून काढण्यासाठी राज्य-शासनाने कठोर उपाय योजले आणि त्यातून तेथे दंगल भडकली. डॉक्टर आणि विद्यार्थी यांच्या मागण्यांचा विचार करण्यासाठी मुख्य मंत्री देवीलाल यांनी मंत्रिमंडळाची जी उपसमिती नेमली तिने दंगलीची आणि तिच्यामुळे झालेल्या हानीची चौकशी मागणी मान्य केली; परंतु इतर दोन मागण्यांबाबत मात्र तिने मौन पाळले. रोहटक येथील वैद्यकीय महाविद्यालय महर्षी दयानंदसरस्वती विद्यापीठाच्या कक्षेतून काढून घ्यावे, या आपल्या मुख्य मागणीचा उपसमितीकडून विचार होत नाही हे दिसून आल्यावर आंदोलनाची व्याप्ती वाढली. सरकारने अनेक डॉक्टरांना अटक करून अत्यंत वाईट परिस्थितीत त्यांना ठेवले. इतकेच नव्हे तर त्यांच्यापैकी तिघेजण आजारी पडलेले असताना त्यांना हातात बेड्या घालूनच रुग्णालयात नेण्यात आले. एकाचे तर संपूर्ण अंथरूणच बेड्यांनी वेढलेले होते !

बन्सीलाल यांच्या कारकीर्दीत असा प्रकार घडला असता तर कोणालाही नवल वाटले-नसते. कारण राज्य करणे म्हणजे जुलूम करणे असाच त्यांचा खाक्या होता. जनता पक्षाचे मुख्यमंत्री देवीलाल त्यापेक्षा काही वेगळा कारभार करतील अशी जी अपेक्षा होती ती गेल्या वर्षभरात चुकीची असल्याचे अनेक प्रसंगांवरून दिसून आलेले आहे. तरी देखील विरोधकांना चिरडण्यासाठी देवीलाल थेट बन्सीलाल यांचाच मार्ग अनुसरतील असे वाटले नव्हते. देवीलाल रोहटक येथल्या वैद्यकीय महाविद्यालयातील डॉक्टरांवर आणि विद्यार्थ्यांवर का संतापले आहेत, याचे कारण राज्य जनता पक्षाच्या अध्यक्षा चंद्रावती यांच्या उद्गारांमध्ये सापडते. आपल्या भारतीय लोकदलाला बदनाम करण्यासाठी जनसंघ गटाने या आंदोलनाला चिथावणी दिलेली आहे असे सांगून चंद्रावती यांनी या संघर्षाला राजकीय रंग देण्याचा प्रयत्न केला. एवढेच सांगून त्या थांबल्या नाहीत. हरयानामध्ये बाहेरून आलेल्या व्यक्तींचा या आंदोलनात पुढाकार आहे, असाही त्यांनी आरोप केलेला आहे. बाहेरून आलेल्या व्यक्ती असा चंद्रावती यांनी मोघम उल्लेख केलेला असला तरी त्यांना नेमके काय म्हणावयाचे आहे हे जाणून घेणे मुळीच अवघड नाही. त्यांना जाट आणि जाटेतर हा फरक अनुस्यूत आहे. देवीलाल यांचे सरकार शैक्षणिक प्रश्नांकडेही जातीय दृष्टिकोनातूनच पहाणार असेल तर चरणसिगांनी प्रवर्तित केलेली चळवळ या ना त्या स्वरूपात चालूच आहे हाच निष्कर्ष निघतो. किसानसंमेलन असो किंवा देवीलाल यांची कडवी राजवट असो, जाटांच्या वर्चस्वाला धक्का पोहोचता कामा नये या खटाटोपातूनच चरणसिंग आणि देवीलाल यांच्यासारखे त्याने समर्थक हालचाली करीत आहेत. म्हणून केंद्र सरकारला रोहटक येथल्या घटनांकडे राज्य सरकारच्या कक्षेतील बाब म्हणून पाहून चालणार नाही. कारण हे राजकारण केवळ सत्तास्थानांपुरतेच भिरभिरत आहे असे नव्हे तर सामाजिक विषमता आणि दुरावा यांना खतपाणी घालण्याचे दुष्ट कार्यही हे राजकारण पार पाडीत आहे. दंगल भडकली की तिच्या कारणांचा शोध घेणे आवश्यकच असते; परंतु ही कारणे मुळातच कशी निपटून काढता येतील याचाही विचार व्हावयास हवा.

□

# अवती-भवती

शरद कृष्णन्

## □ महाराष्ट्राच्या मुख्यमंत्र्यांबरोबर बातचीत–

महाराष्ट्रामधील अनपेक्षित सत्ताबदलाचे पडसाद साऱ्या देशभर उमटले. विविध राजकीय पक्षांनी आपल्या प्रतिक्रिया व्यक्त केल्या. शरद पवार यांच्या धाडसी निर्णयाचे काही मंडळींनी स्वागत केले. या संदर्भात जी टीका झाली ती प्रामुख्याने जनता पक्षावर झाली. एवढी विसाडघाई करून आणि शरद पवार यांच्यासारख्या फुटिराचा पाठपुरावा करून जनता पक्षाने काय मिळविले ? याउलट शरदजींनी आपल्या ३५–४० पाठिराख्यांच्या जोरावर मुख्यमंत्रिपद तसेच सत्तेमध्ये बरोबरीचा वाटा मिळविला. ज्यांच्या हातून सत्ता गेली त्यांनी अर्थात शरद पवार यांच्या नावे बोटे मोडली. या टीका-टिपणी झेलीत नवीन मुख्यमंत्री सत्तारूढ झाले. देशामधील प्रगत आणि औद्योगिकदृष्टचा महत्त्वपूर्ण असलेल्या महाराष्ट्राची सत्तासूत्रे स्वीकारणाऱ्या या नवीन मुख्यमंत्र्याकडे साऱ्या देशाचे लक्ष वेधले. जनता पक्षाबरोबर सहकार्य करून सरकार स्थापन करण्याच्या त्यांच्या निर्णयाने इंदिरा काँग्रेसला जोरदार दणका दिला आणि काँग्रेस विरघळून जाण्याच्या प्रक्रियेला आणखी गती मिळाली. प्रक्रियेला वेगाने प्रारंभ झाला असला तरी ही विभागणी सध्या तरी राजकीय विचार आणि ध्येयधोरणे यांच्या संदर्भात झालेली नसून इंदिरा-विरोधक आणि इंदिरा-समर्थक अशी ही विभागणी आहे.

काँग्रेस पक्षाच्या श्रेष्ठींच्या निर्णयाला धूप न घालता, आणि त्यांचा अधिकृतरित्या विरोध असताना शरद पवार यांनी घेतलेल्या पक्ष सोडण्याच्या निर्णयाला असाधारण महत्त्व आहे. या निर्णयामागे व्यक्तिगत महत्त्वकांक्षा आहे, हे तर कोणालाच नाकारता येणार नाही; पण त्याचबरोबर या निर्णयामागे इंदिराविरोधात उभे राहण्याचे ठाम धोरणही आहे. तर असे राजकीय वादळ निर्माण करून सत्तासंपादन करणाऱ्या महाराष्ट्रामधील या सगळचात तरुण मुख्यमंत्र्याबरोबर झालेली प्रश्नोत्तररूपी बातचीत अनेक शंकाकुशंका दूर करण्यास सहाय्यभूत ठरेल.

प्रश्न : काँग्रेस कार्यकारिणीने पक्षामधून तुमची हकालपट्टी करण्याचा निर्णय घेतला असला तरी तुम्ही स्वतःला काँग्रेसपक्षीय मानता का ? काँग्रेस कार्यकारिणीचे एक ज्येष्ठ सदस्य श्री. वसंतराव नाईक यांनी तुमची 'नंबरी फुटीर' अशा शब्दांत संभावना केली आहे. तुमचे सरकार विश्वासघातावर आधारलेले आहे, असेही ते म्हणतात. आता सरकार स्थापन केल्यावर तुम्ही काँग्रेसमध्ये राहणार की जनता पक्षात जाणार ?

उत्तर : असेही काही लोक आहेत की, जे केवळ शरीराने काँग्रेसमध्ये आहेत, तथापि त्यांची मने इंदिराजींबरोबर होती आणि विचार शक्ती इंदिरा काँग्रेससाठी काम करीत होती. वसंतराव नाईक हे अशा केवळ शरीराने आमच्या बरोबर असलेल्या मंडळींपैकीच एक. आमच्या पक्षात राहून ते सतत इंदिराजींचा पाठपुरावा करतात, त्यांच्या या धोरणामुळे फाटाफुटीनंतरही काँग्रेस अंतर्गत इंदिराजींचा पुरस्कार करणारा एक गट तयार झाला. इतर कशापेक्षाही नाईक यांना स्वतःचे आणि स्वतःच्या कुटुंबाचे हितसंबध जपण्यात जास्त गोडी आहे.

स्वतःच्या पुसदमधून त्यांनी आपल्या पुतण्याला उभे केले आणि नंतर इंदिरा गांधींबरोबर छुपी तडजोड करून त्यांचाही पाठिंबा मिळविला. बाईंनी साऱ्या विदर्भाचा दौरा केला, तथापि पुसदला जाण्याचे टाळले. साऱ्या विदर्भात काँग्रेसला मोठा पराभव पत्करावा लागला; पण वसंतरावांचा पुतण्या मात्र निवडून आला. व्यक्तिगत हितसंबंध लक्षात घेऊन काँग्रेस विरोधकांशी तडजोड करणाऱ्यांना माझा कठोर विरोध आहे ! इंदिराजींच्या पक्षाला विदर्भात काही जागा मिळवून देण्यात नाईकांनी हातभार लावला, असेही माझे म्हणणे आहे. आता मला सांगा, आमच्या पक्षात राहून पक्षाचा विश्वासघात करणारे वसंतराव विश्वासघातकी की मी ? आता मला तशी सूचना करण्याचा काही अधिकार नसला तरी मला असे वाटते की, अशा मंडळींनी काँग्रेसबाहेर पडले पाहिजे आणि पक्षावरील ही नसती जबाबदारी हलकी केली पाहिजे. त्यामुळे काँग्रेस बळकट होईल. जुन्या सरकारवर नाईकांचा मोठा दबाव होता. परंतु आता त्यांना काही करता येत नसल्याने आमच्या नावे बोटे मोडून आमचे सरकार पाडण्याच्या कारवाया त्यांनी सुरू केल्या आहेत आणि त्यासाठी 'नंबरी फुटीर' सारखे शेळके शब्द ते वापरीत आहेत. यापेक्षा त्यांच्या विधानांना अर्थ नाही.

प्रश्न : काँग्रेस नेतृत्वाखाली पहिलें जनता सरकार स्थापन करण्यात यश मिळवून तुम्ही एक नवीन मार्ग स्वीकारला आहे. काँग्रेस पक्षाची अखेर होण्यास आता प्रारंभ झाला आहे, असे म्हणता येईल का ?

उत्तर : मला प्रथम एक गोष्ट स्पष्ट केली पाहिजे ती ही की, नवे सरकार हे जनता पक्षीय सरकार नाही. आम्ही विधानसभेमध्ये प्रगत लोकशाही आघाडी स्थापन केली आहे या आघाडीमध्ये जनता, शेकाप, रिपब्लिकन, काही काँग्रेसवाले आणि माझ्या निर्णयाचे समर्थन करणारा माझा गट यांचा समावेश आहे. ही आघाडी प्रगत विचारांचा आणि डाव्या विचारसरणीचा पुरस्कार करते. आघाडीमध्ये सहभागी झालेल्या सर्वांचीच लोकशाहीवर नितांत श्रद्धा आहे. म्हणूनच या सरकारला एका पक्षाचे सरकार म्हणणे संयुक्तिक होणार नाही. काही निश्चित कार्यक्रम आणि ध्येयधोरणे ठरवून

एकत्र आलेल्या मित्रपक्षांचे हे सरकार आहे. माझी अशी खात्री आहे की, महाराष्ट्रामधील या घडामोडींचे देशाच्या राजकारणावर परिणाम होतील आणि एका नवीन प्रक्रियेला प्रारंभ होईल. कॉंग्रेस पक्षामध्येही इंदिरा कॉंग्रेसबरोबरील आघाडीबाबत मी योग्य प्रसंगी नाराजी व्यक्त केली होती. आजही माझ्या निर्णयाचे समर्थन करणारा एक तट कॉंग्रेसमध्ये आहे, याबद्दल मला जराही शंका नाही. आपली हुकूमशाही वृत्ती कायम ठेवून झालेले इंदिराजींचे पुनरागमन हा अन्य सर्व प्रश्नांपेक्षा मोठा प्रश्न आहे. लोकशाहीवर श्रद्धा असणाऱ्या सर्व मंडळींसमोर हे एक मोठे आव्हान आहे. इंदिराजींच्या समर्थकांनी आणीबाणीचाही पुरस्कार चालविला असून हे लोण आता महाराष्ट्रातही येऊन थडकले आहे. अगदी अलीकडेच नाशिकराव तिरपुडे यांनी जाहीररित्या आणीबाणीचे समर्थन केले. निष्ठावंत कॉंग्रेसवाले म्हणून आम्ही या इंदिरा विरोधाच्या प्रवाहात उभे आहोत. लोकशाहीचा मूलभूत पाया आणि विचारसरणी बळकट करायची असेल तर या हुकूमशाही प्रवृत्तींच्या विरोधात उभे असलेल्यांनी एकत्र येण्यात काहीही गैर नाही.

केवळ कॉंग्रेसनेच नव्हे, तर हा विचार घेऊन उभे असलेल्या सर्वांनी एकत्र येऊन हुकूमशाही प्रवृत्तीशी लढा दिला पाहिजे. जनता पक्ष इंदिराजींच्या हुकूमशाही प्रवृत्तीविरुद्ध लढतोच आहे. अशा वेळी आमचे अन्य मतभेद बाजूला ठेवून या महत्त्वपूर्ण प्रश्नावर लक्ष केंद्रित करणे अत्यंत आवश्यक आहे.

प्रश्न : अशा स्वरूपाच्या एकत्रीकरणाचा कॉंग्रेसवर काय परिणाम होईल ? कॉंग्रेसचे आणखी विघटन होईल काय ?

उत्तर : याबाबत एकच म्हणता येईल की, हुकमशाही प्रवृत्तीशी टक्कर घेण्याची तयारी कॉंग्रेसने दाखविली आणि केंद्रीय नेतृत्वाने याबाबतीत पूर्ण विचार केला तर कॉंग्रेसला खचित भवितव्य आहे, असे मला वाटते. कॉंग्रेस हा लोकशाहीवादी पक्ष आहे, असा लोकांचा विश्वास आहे. तथापि आमच्या महाराष्ट्रामध्ये काही कॉंग्रेस पक्षीय लोक सरंजामशाही पद्धतीमधील सरदारांप्रमाणे वागतात. त्या जमान्यामधील सरदारांनी सर्वस्व गमविल्यावर ज्याप्रमाणे कल्पनाविश्वात राहून दिवस काढले त्याप्रमाणे या सरदारांची अवस्था झाली आहे. जुन्या सरदारांप्रमाणेच मोठमोठ्या शाही वाड्यांतून हे कॉंग्रेसवाले रहातात. तथापि बदलती परिस्थिती स्वीकारण्याची त्यांची तयारी नाही. आता दिवस बदलले आहेत, हे त्यांना पटत नाही. हे बदल पचविण्याची शक्ती त्यांच्याजवळ नाही. निदान ते जाणून घेण्याची दृष्टी तरी असावी; पण तीही त्यांच्याजवळ नाही. त्यांची मन:स्थिती द्विधा झालेली आहे. त्यांनी आपले सारे लक्ष इंदिरा गांधींवर केंद्रित केले आहे. या राजकीय आजारामुळे पूर्ण शक्तीनिशी ते उभे राहू शकत नाहीत. कर्नाल आणि आझमगढमध्ये आमच्या पक्षाचा जो दारुण पराभव झाला त्यामागे ही कारणपरंपरा आहे. सर्वसाधारणपणे असे म्हणता येईल की, जनता आपल्याबरोबर येईल हे गृहीत धरून वाटचाल करण्याचे दिवस सरले आहेत. जनतेने आपली मते निश्चित केलेली दिसतात. ज्यांचा लोकशाही तत्त्वांवर विश्वास आहे ते जनता पक्षाचा पाठपुरावा करीत आहेत. तथापि जनता पक्षाच्या ध्येयधोरणांमुळे ज्यांचा भ्रमनिरास झाला आहे अथवा या ना त्या कारणामुळे ज्यांना जनता पक्ष नको आहे, ते सारे इंदिरा गांधींभोवती जमा झाले आहेत.

प्रश्न : वेगळ्या पद्धतीने विचार करणाऱ्या दोन गटांमध्ये जनता विभागली गेली आहे, असे आपल्याला सुचवायचे आहे काय ?

उत्तर : होय. परिस्थिती निश्चितपणे तशीच आहे, हे नाकारण्यात अर्थ नाही. लोक एक तर जनता पक्षाबरोबर आणि इंदिराविरोधात आहेत किंवा ते इंदिराजींबरोबर असून जनता पक्षाशी संघर्ष करण्यास उभे आहेत.

प्रश्न : कॉंग्रेस-नेतृत्व देशामधील ही बदलती राजकीय परिस्थिती लक्षात घेण्यास असमर्थ ठरल्यामुळे तुम्ही पक्षविरोधात जाऊन सरकार स्थापण्याचा निर्णय घेतलात काय ?

उत्तर : मी पोटनिवडणुकांचे निकाल काळजीपूर्वक पहात होतो. चंद्रजित यादव यांच्यासारख्या ज्येष्ठ कॉंग्रेस-नेत्याची निवडणुकीमध्ये अनामत रक्कम जप्त होते, कर्नालमध्येही कॉंग्रेसला दारुण पराभव पत्करावा लागतो. यासारख्या गोष्टी पाहिल्यावर माझे असे मत बनले की, परिस्थिती बदलली आहे. वारा कोणत्या दिशेने वाहातो आहे, हे या निवडणूक-निकालांनी दाखवून दिले. सर्वसामान्य नागरिकांनी मतपेटीद्वारा जे निर्णय दिले ते प्रमाण मानून आम्हाला पुनर्विचार करणे भाग पडले.

प्रश्न : महाराष्ट्रामध्ये पुढाकार घेऊन तुम्ही जे बदल घडवून आणलेत त्यामागे केवळ हीच कारणे होती काय ?

उत्तर : माझ्या हे लक्षात आले की, कॉंग्रेसने जर एकाकी जायचे ठरविले तर ती जनता पक्षाशीही लढा देऊ शकणार नाही किंवा इंदिराजींनाही थोपवू शकणार नाही. कालप्रवाहाबरोबर फाटाफूट वाढत जाऊन कॉंग्रेसचा नाश होईल. तेव्हा निश्चित विचार करून इंदिराजींना विरोध करणे हे सर्वांत महत्त्वाचे आहे, असे मानून मी काही अप्रिय निर्णय घेतले.

प्रश्न : सध्याच्या परिस्थितीमध्ये हा एकमेव मार्ग होता असे आपल्याला वाटते काय ?

उत्तर : लोकशाही पद्धतीनेच जायचे असे ठरविल्यावर दुसरा काही पर्याय शिल्लक होता असे मला वाटत नाही. जी वस्तुस्थिती आहे ती आहे त्या स्वरूपात स्वीकारता आलीच पाहिजे. मात्र त्याचबरोबर हेही लक्षात ठेवले पाहिजे की, राजकारणामध्ये स्टॅगनंट असे काहीही नसते.

प्रश्न : कम्युनिस्टांना, मग ते उजवे असोत किंवा डावे, आपण लोकशाहीवादी मानता का ?

उत्तर : डाव्या कम्युनिस्टांनी आपण लोकशाहीवादी असल्याचे दाखवून दिले आहे. उजव्या कम्युनिस्टांना अजूनही या महत्त्वाच्या प्रश्नाची जाणीव होऊ नये याचे आश्चर्य वाटते.

प्रश्न : जनता पक्ष म्हणजे विविध विचारप्रवाहांचे परिस्थितीने घडविलेले एकत्रीकरण आहे. दिल्लीमध्ये या पक्षाची जी परिस्थिती आहे त्यापेक्षा मुंबईमधील परिस्थिती फारशी वेगळी नाही. सत्तासंघर्षाला तत्त्वज्ञानाचे स्वरूप देणे योग्य आहे काय ?

उत्तर : माझ्या राज्याबाबत बोलायचे झाले तर एक गोष्ट मी स्पष्ट करू इच्छितो की, आमचे सरकार काही विशिष्ट कार्यक्रम राबविण्यास वचनबद्ध आहे. आणि लोकशाहीचे रक्षण व संवर्धन हा त्याचा मूलभूत पाया आहे.

प्रश्न : आर्थिक आणि सामाजिक प्रश्नांच्या संदर्भात काही निश्चित कार्यक्रम तुम्ही आखला आहे काय ?

उत्तर : या गोष्टी तर महत्त्वाच्या आहेत. या आघाड्यांवरील आमचा कार्यक्रम आम्ही निश्चित केला असून हाती घेतलेल्या योजनांवर आम्ही अंतिम हात फिरवीत आहोत. हा कार्यक्रम मी स्वतः, तसेच एस्. एम्. जोशी, राजारामबापू पाटील, उत्तमराव पाटील, प्रभाकर कुंटे यांच्या समितीने निश्चित केला आहे. रोजगार हमी योजना आम्हाला राबवायची आहे. त्याखेरीज भूमिहीन कामगार आणि अन्य शेतकीकामगार यांच्या बाबतीतही आम्ही विचार केला असून पहिली गोष्ट म्हणजे त्यांचे वेतन आम्ही २० ते २५ टक्क्यांनी वाढविणार आहोत. शेतमजूरांच्या वेतनाची आम्ही ज्याप्रमाणे पुनर्रचना करण्याचे ठरविले आहे त्याचप्रमाणे शेतमालाच्या किमतीबाबतही आम्ही पुनर्विचार करणार आहोत. वीज दराबाबत नागरी व ग्रामीण विभागात असलेली तफावत आम्ही दूर करण्याचे ठरविले आहे. शेतीसाठी आणि उद्योगधंद्यासाठी वीज एकाच दराने उपलब्ध करून दिली जाईल. शेतीव्यवसाय करणारांना या गोष्टीचा मोठाच फायदा मिळेल. कापूस एकाधिकार योजना आम्ही अमलात आणण्याचे ठरविले आहे. या योजनेच्या अंमलबजावणीला काही हितसंबंधितांकडून कठोर विरोध होईल हे खरे असले तरीही हा विरोध मोडून काढून या योजनेची अंमलबजावणी करण्याचे आम्ही ठरविले आहे. भूमिहीन शेतमजुरांसाठी घरे बांधून देण्याची एक योजना आम्ही हाती घेत आहोत. ही घरे म्हणजे झोपड्या नव्हेत, तर ती पक्के बांधकाम असावीत असा या बाबतीत आमचा आग्रह आहे. याखेरीज–खेड्यातील पाणीपुरवठ्याची परिस्थिती सुधारून गरजू शेतकऱ्यांना, विशेषतः आर्थिक व अन्य दृष्टीने कमकुवत असलेल्या शेतकऱ्यांना व्याजरहित कर्ज देण्याच्या दृष्टीने आम्ही तरतूद करीत आहोत.

प्रश्न : नागरी विभागातील प्रश्नांबाबत आपण काय पावले उचलणार आहात ?

उत्तर : नागरी विभागामधील सर्वांत भेदक प्रश्न आहे झोपडपट्ट्यांचा. स्वाभाविकपणेच या प्रश्नाला आम्ही अग्रक्रम देणार आहोत. तसेच किमान ८·३३% टक्के बोनस कामगाराला मिळालाच पाहिजे, अशी आमची धारणा असून या निर्णयाची त्वरित अंमलबजावणी करण्यास आम्ही बांधलेले आहोत.

प्रश्न : तथापि बोनसबाबतचे हे सूत्र अद्यापि केंद्र सरकारने स्वीकारलेले नाही.

उत्तर : आम्ही त्याबाबत वाट न पहाण्याचे ठरविले असून बोनसप्रश्नाची त्वरित अंमलबजावणी करण्यास आम्ही बांधलेले आहोत. आमचे सरकार हे प्रामुख्याने कामगार, शेतकरी, अल्पसंख्य, मध्यमवर्गीय आणि हरिजन-गिरिजन यांच्या भल्यासाठी जेवढ करता येईल तेवढ करण्यास उत्सुक आहे. याबाबत कोणाच्याही मनात कोणताही संशय नसवा म्हणून मुद्दाम मी हे स्पष्ट करीत आहे.

प्रश्न : प्रगत आणि लोकशाहीवादीशक्ती एकत्र आणण्याच्या प्रयत्नांना आपण प्रारंभ केला आहे असे म्हणता, या आपल्या प्रयत्नामध्ये पूर्ण यश येईल आपणास असे वाटते का ?

उत्तर : आज परिस्थितीच अशी आहे की, या ध्येयधोरणावर विश्वास असलेल्यांना एकत्र येण्यावाचून गत्यंतरच नाही. काही निवड करण्यास दुसरा पर्यायच शिल्लक नाही. त्यामुळेच या शक्तींना एकत्र यावेच लागेल.

प्रश्न : प्रगत विचाराच्या मंडळींनी एकत्र येऊन, सनातनवाद्यांविरुद्ध उभे राहिले पाहिजे आणि आवश्यकता वाटल्यास त्यासाठी अंतर्गत संघर्षासाठी उभे राहिले पाहिजे असे आपल्याला वाटते का ?

उत्तर : मला असे वाटते की, अशा स्वरूपाचा अंतर्गत संघर्ष निर्माण करण्याची ही वेळ नव्हे. कारण इंदिराजींच्या हुकूमशाहीला विरोध हे एकत्र आलेल्या सर्व शक्तींचे मुख्य उद्दिष्ट आहे. आज तरी या गोष्टीवर लक्ष केंद्रित केले पाहिजे. या हुकूमशाही प्रवृत्ती पराभूत झाल्यावर अन्य गोष्टींचा विचार करता येईल.

प्रश्न : इंदिरा गांधींबरोबरील संघर्षामध्ये यश मिळवायचे असेल तर लोकांच्या आर्थिक परिस्थितीमध्ये सुधारणा करण्यासाठी शासनाने प्रयत्न करणे आवश्यक आहे, असे आपल्याला वाटत नाही का ?

उत्तर : ही गोष्ट तर खरीच आहे. तथापि लोकशाहीचे रक्षण आणि समाजामधील दुर्बल घटकांसाठी आखलेल्या योजनांची अंमलबजावणी या दोन्ही गोष्टी आम्हाला एकदम साधायच्या आहेत. आपल्या लोकशाहीचे महत्त्वपूर्ण घटक असलेल्या हरिजनांना आणि अल्पसंख्याकांना विश्वास वाटावा, यासाठी आम्ही सतत प्रयत्नशील रहाणार असल्याने राजकीय उद्दिष्टासाठी त्यांच्या प्रश्नांचे कोणी भांडवल करणार असेल तर ते आम्ही खपवून देणार नाही.

प्रश्न : यशवंतराव चव्हाण म्हणजे आपले राजकीय गुरू. कॉंग्रेस-कार्यकारिणीचा निर्णय आपण धाब्यावर बसविण्याचे ठरविलेत या गोष्टीचे त्यांना अतीव दुःख झाले. तथापि आपल्याला अजूनही त्यांचे आशीर्वाद आहेत अशी एक भावना आहे.

उत्तर : आपल्याशी मोकळेपणाने बोलायचे ठरविले तर काही गोष्टी सांगितल्या पाहिजेत. कॉंग्रेस कार्यकारिणीची बैठक झाल्यावर मी त्यांना भेटलो. बाबा, कार्यकारिणीचा निर्णय स्वीकारण्याच्या मनस्थितीत मी नाही. बदललेली राजकीय परिस्थती कार्यकारिणी लक्षातच घेत नाही. नेतेमंडळी अजूनही काळाबरोबर धाव घेऊ शकत नाहीत. अजूनही ते ७४–७५ साली करीत असत त्याच पद्धतीने विचार आहेत. आज ७८ साल उजाडले आहे. कक्षा रुंदावल्या आहेत. प्रश्नांचे स्वरूप बदलले आहे. त्यांनी मला पटवून देण्याचा खूप प्रयत्न केला. मी मुंबईला परतल्यावर माझ्याशी फोनवर दोन वेळा संपर्क साधून कार्यकारिणीने घेतलेला निर्णय अव्हेरू नये, असे सुचविले. तथापि माझे मित्र, विशेषतः माझ्या विचाराचा पुरस्कार करणारे तरुण आमदार नाराज झाले. एकदा घेतलेल्या निर्णयाचा पाठपुरावा करण्याच्या दृष्टीने आवश्यक असलेली पावले तर उचलली नाहीत तर स्वीकारलेल्या नवीन विचाराची प्रगती होणार नाही, असे त्यांचे मत पडले. आम्ही आमच्या ज्येष्ठ नेत्यांना मानतो. यशवंतरावजी आमचे नेतेच आहेत. तथापि बदललेल्या परिस्थितीमध्ये आमचा विचार होणार नसेल तर मतभेद अपरिहार्यच आहेत.

प्रश्न : आज ना उद्या कॉंग्रेस कार्यकारिणीला आपले म्हणणे आपण पटवून देऊ शकू असे तुम्हाला वाटते काय ?

उत्तर : होय. मी घेतलेले निर्णय सर्वस्वी योग्य होते हे कार्यकारणीला एक दिवस मान्य करावे लागेल असा मला विश्वास वाटतो.

पृष्ठ २० वर

# परिवर्तन

## अपेक्षित वेग का नाही ?

वा. दा. रानडे

गेल्या पंधरा ऑगस्टला आपल्या स्वातंत्र्यास ३१ वर्षे पुरी होत आहेत. आणीबाणी उठल्यानंतर व जनता सरकार अधिकारावर आल्यानंतरचा हा दुसरा स्वातंत्र्यदिन. स्वातंत्र्यदिनानिमित्त गेल्या वर्षी लिहिताना आपल्या लोकशाहीपुढील नव्या समस्या व नव्या आव्हानांकडे मी लक्ष वेधले होते. मुख्य आव्हान लोकशाही टिकविण्याचे. या देशात पुन्हा हुकूमशाही कधीही येऊ द्यावयाची नाही, हा आपला निर्धार असायला हवा.

हुकूमशाहीचा धोका पूर्णपणे टळला नसून हुकूमशाही शक्ती व प्रवृत्ती पुन्हा डोके वर काढीत आहेत. असे गेल्या वर्षातील घटनांवरून दिसून आले. लोकसभा-निवडणुकीतील पराभवानंतर इंदिरा गांधींचा राजकीय अस्त झाला असा घाईने निष्कर्ष काही राजकीय निरीक्षकांनी काढला होता; पण त्यांच्या नेतृत्वाखाली हुकूमशाही प्रवृत्तीचे गट पुन्हा संघटित होत आहेत हे गल्या वर्षात दिसून आले. काँग्रेसची सूत्रे आपल्या हाती येत नाहीत असे दिसताच इंदिरा गांधींनी त्या पक्षात पुन्हा फूट पाडून स्वतःचा वेगळा पक्ष काढला. आंध्र प्रदेश व कर्नाटकच्या विधानसभा-निवडणुकात त्यांच्या पक्षाने मोठा विजय मिळवून दोन राज्यांत आपली सत्ता प्रस्थापित केली आणि महाराष्ट्रातही जवळजवळ काँग्रेसएवढ्याच जागा जिंकून सत्तेत अर्धा वाटा मिळविला. दोन काँग्रेस पक्षांचे हे सरकार फार काळ टिकले नाही, सत्ता टिकविण्यासाठी दोन काँग्रेसच्या एकीकरणाचा घोळ वसंतदादांनी घातला; पण इंदिरा गांधींच्या नेतृत्वाखाली एकीकरण असा या एकीकरणाचा प्रत्यक्षात अर्थ होता. एकीकरणासाठी १० जुलैपर्यंत मुदत काँग्रेस कार्यकारिणीने दिली होती. ती संपताच यासंबंधीच्या वाटाघाटी यापुढे न करण्याचा आणि महाराष्ट्रात इंदिरा काँग्रेसशी केलेली आघाडी संपविण्याचा निर्णय कार्यकारिणीने घेतला; पण त्याचबरोबर शरद पवार गटाला जनता पक्षाच्या सहकार्याने मंत्रिमंडळ बनविण्यास नकार दिला. पवारांनी हा आदेश न मानता मंत्रिमंडळ बनविले. या शिस्तभंगाबद्दल त्यांच्या गटाला काँग्रेसमधून काढून टाकण्यात आले. या निर्णयाचा फेरविचार करावा असे कार्यकारिणीचे एक सभासद डॉ. करणसिंगांनी व्यक्त केले असले तरी चव्हाण व करणसिंग कार्यकारिणीच्या बहुसंख्य सभासदांना आपल्या बाजूला कितपत वळवू शकतील याची शंका आहे. दरम्यान इंदिरा काँग्रेसशी कोणत्याही प्रकारचे सहकार्य करावयाचे नाही, असा कार्यकारिणीचा निर्णय असता वसंतदादा गटाने विधिमंडळात पुन्हा इंदिरा काँग्रेसबरोबर आघाडी केली; पण त्याबद्दल त्यांच्याविरुद्ध शिस्तभंगाची कारवाई मात्र कार्यकारिणीने केली नाही. महाराष्ट्रात काँग्रेसचे बहुसंख्य आमदार तर पवारांच्या मागे आहेतच; पण अठरा जिल्हा काँग्रेस अध्यक्षांनीही त्यांना पाठिंबा दर्शविला आहे पवार गट तर फुटलाच; पण वसंतदादांचा गट तरी काँग्रेसमध्ये किती काळ राहील ? तो इंदिरा काँग्रेसला मिळण्याचा संभव आहे. एकीकरणाच्या प्रश्नावर काँग्रेसमध्ये पुन्हा मोठी फूट पडणार काय असे वाटत होते; पण सध्या तरी ही फूट महाराष्ट्रापुरतीच मर्यादित राहिली आहे; पण दोन काँग्रेस निष्प्रभ असून खरा प्रभावी विरोधी पक्ष आपलाच, अशी प्रतिमा इंदिरा काँग्रेसने निर्माण केलेली आहे.

संसदीय लोकशाहीत प्रभावी विरोधी पक्ष हवाच; पण तो लोकशाही मूल्ये मानणारा आणि लोकशाही कार्यपद्धतीवर विश्वास असणारा हवा. इंदिरा काँग्रेसबद्दल तशी खात्री देता येत नाही. सत्तारूढ जनता पक्षाला प्रभावी लोकशाही पर्याय डावी आघाडी होऊ शकेल काय ? तीही शक्यता सध्या तरी दिसत नाही. पश्चिम बंगाल व त्रिपुरामध्ये मार्क्सवाद्यांच्या हाती सत्ता आली. इतर काही राज्यांतही त्यांचे बळ वाढत आहे; पण राष्ट्रीय पातळीवर जनता पक्षाला प्रभावी पर्याय बनण्याइतके स्थान त्यांनी अजून मिळविलेले नाही. कम्युनिस्टांसह सर्व डाव्या गटांची आघाडी उभारण्याच्या प्रयत्नांनाही अजून यश आलेले नाही.

इंदिरा काँग्रेसचे बळ आपण वाजवीपेक्षा अधिक लेखीत आहोत काय ? महाराष्ट्रात इंदिरा काँग्रेसला सत्तेवरून हटविण्यासाठी जनता पक्षाने दुय्यम भूमिका पत्करून शरद पवार गटाशी आघाडी केली ते योग्य झाले का ? या प्रश्नाबद्दल पूर्वीच्या लेखातून मी चर्चा केलेलीच आहे. त्याची पुनरुक्ती करीत नाही; पण इंदिरा काँग्रेसच्या बळाचे वास्तव मूल्यमापन आपण करायला हवे असे मला वाटते. या पक्षाचे बळ कमी लेखणे चुकीचे, तसेच जास्त लेखणेही चुकीचे. दक्षिणेतल्या दोन राज्यांतील सत्ता हाती आल्यानंतर त्याचे बळ थोडे वाढले; पण ही वाढ आता पुन्हा खुंटल्यासारखी दिसत आहे. अशा परिस्थितीत त्याचे बळ जास्त लेखून जनता पक्षाने काँग्रेसमधल्या एका गटाबरोबर सहकार्य करणे कितपत योग्य आहे ? महाराष्ट्रातील प्रयोग हा केवळ महाराष्ट्रापुरता न मानता राष्ट्रीय पातळीवरील प्रयोगाची सुरुवात या दृष्टीने काही जनता-नेते त्याकडे पहात आहेत; पण याबाबत भलत्या अपेक्षा बाळगण्याची चूक आपल्या हातून होत नाही ना, हेही पहायला हवे. महाराष्ट्रातील प्रयोग सत्तेशी निगडित आहे. सत्ता हाती येण्याचा संभव नसता तर अशी आघाडी झाली नसती हे उघडच आहे आणि इतर राज्यांत तसा संभव नसल्याने काँग्रेसमधल्या एखाद्या गटाचे सहकार्य जनता पक्षाला मिळण्याची शक्यता नाही व त्याची आवश्यकताही नाही; पण जनता पक्षातील काही गट या सहकार्याचा दुसऱ्या एका दृष्टिकोनातून विचार करीत आहेत. पक्षातील अंतर्गत झगड्यात आपली बाजू बळकट करण्यासाठी त्यांना हे सहकार्य हवे आहे. जनता पक्षामधील घटकांची फेर मांडणी काँग्रेसवाले विरुद्ध बिगरकाँग्रेसवाले अशा दोन गटांत होऊ पहात आहे. काँग्रेसवाल्यांच्या गटात संघटना काँग्रेस, लोकशाहीवादी काँग्रेस आणि चंद्रशेखर यांच्यासारखे बंडखोर काँग्रेसजन आहेत, तर बिगरकाँग्रेस गटात भारतीय लोकदल आणि जनसंघ हे घटक आहेत. समाजवाद्यांचे धोरण निश्चित नाही. काँग्रेसवाले गट जनता पक्ष आपल्या प्रभावाखाली आणण्याचा प्रयत्न करीत आहेत

पृष्ठ १८ वर

# कलकत्ता मेल

तारा पंडित

## □ दिवस बदलला आहे.

नक्षलवाद्याच्या अनेक तत्त्वांमध्ये वस्तूंची नासधूस हेही एक कलम असलं पाहिजे किंवा शहरात नासधूस न केली तर आपला 'नक्षलवादीपणा' सिद्ध होत नाही असा झाडून साऱ्या नक्षलवाद्यांचा पक्का समज असावा. त्यामुळे आता कशावर धाड घालायची याचीच चर्चा प्रामुख्याने त्यांच्या बैठकीत होत असावी असे वाटते. कारण पूर्वी 'ऐन भरभराटीच्या' काळात त्यांनी एकोणीस पुतळ्यांना जमीनदोस्त केले होते. बिचारी एके काळची ही मोठी माणसे ऊन, पाऊस, वारा सहन करीत त्यांच्याकडे ढुंकूनही न पाहणाऱ्या पब्लिकसाठी पुतळ्यांच्या स्वरूपात चौरस्त्यावर किंवा जिथे ठेवले तिथे पाय रोवून उभी राहतात आणि आजकालच्या ह्या अविचारी पोरा-सोरांच्या हातून होणाऱ्या विटंबनेला बळी पडतात. अशीच पाळी काल नेताजी सुभाषचंद्र बोस यांच्या पुतळ्यावर आली. याअगोदर दोन दिवसापूर्वीच ईश्वरचंद्र विद्यासागर आणि राजा राममोहन राय यांच्या पुतळ्यांची मोडतोड करून झाली होती आणि आता नक्षलवाद्यांनी आपली वक्रदृष्टी वळविली नेताजींकडे !

नेताजींचा ह्या पुतळा तर त्यांच्याच नावे असलेल्या संस्थेच्या आवारात गप्प उभा होता. वास्तविक ह्या इमारतीभोवती उंचच उंच भिंत आहे. समोर भले थोरले लोखंडी गेट आहे आणि बाहेर सतत लाठीधारी मिशीवाल्या (गाफील) पोलिसांचा पहारा आहे. तरीसुद्धा हे नक्षलवादी आत कसे घुसले कोण जाणे ! त्यांनी सुभाषांचा दगडी पुतळा बैठकीवरून चक्क खाली काढला. त्यांची तिरकी टोपी वाकडी केली. हनुवटीवर ठोसे मारले. चेहऱ्यावर लाल रंग दिला....१९७१ साली सुभाषचंद्राच्या ह्या पुतळ्यावर असाच हल्ला झाला होता. तेव्हा त्यांचा चेहरा काळा केला होता. आता त्यावर लाल रंग चढविला आहे !

ह्याच परिसरात दोन फलकही आढळले. त्यावर लिहिले होते–'प्रत्येक ठिकाणी कॉ. चारु मजुमदारचेच पुतळे उभारा ! आणि कॉ. सन्तोष राणा यांना लाल सलाम !' आता ह्या हालहाल झालेल्या पुतळ्याची रवानगी संस्थेच्या अडगळीच्या खोलीत झाली आहे असे कळले.

बिचारे नेताजी ! एके काळी सिंहाची गर्जना करणारा ह्या वीरपुरुष ! देशप्रेमापोटी आपले जीवन झोकून दिलेला आणि तरुणांची संघटना बांधणारा अद्वितीय कीर्तीचा नेता ! आज मात्र विध्वंसक प्रवृत्तीच्या तरुणांच्याच हाती स्वतःच्या स्मारकाच्या स्वरूपात सापडला आहे. कुठे गेले त्यांचे अचाट कर्तृत्व ? कुठे हरवली त्यांची सिंहगर्जना ? काळाच्या ओघात तो आवाज पुरता विरून गेला काय ? उरले फक्त दगडी शिल्प ! आणि त्याच्यावरही असा अडगळीच्या खोलीत पडून राहण्याचा दारुण प्रसंग ! खरेच, दिवस बदलला आहे, दिवस बदलला आहे.... □

## ससेहोलपट

बर्द्वानपासून ५० कि. मी. अंतरावर निर्वासितांचा कँप आहे. हे निर्वासित कित्येक दिवस दंडकारण्यात होते. तिथे त्यांना राहण्याची इच्छा नसल्याने त्यांना त्यांच्या बंगालमध्ये आणण्यात आले; पण इथे आल्यानंतर लवकरच त्यांनी दंडकारण्यात परत जाण्याचे ठरविले. याची मुख्य कारणे म्हणजे येथील भीषण दारिद्र्य, अशाश्वत जीवन आणि परिस्थितीचा तणाव हीच असावीत. आता ह्या तीस हजार निर्वासितांना परत पाठवायचे म्हणजे प्रथम त्यांना बरद्वान स्टेशनपर्यंत आणून सोडायला हवे. त्यासाठी लॉरीजची व्यवस्था करण्यात आली होती. बरद्वान स्टेशनवर पोचल्यानंतर तेथून ते रेल्वेने दंडकारण्याकडे निघणार हे ठरले होते. लॉरीजच्या काही चकरा झाल्यानंतर त्यांनी पुन्हा जाण्यास अनिच्छा प्रदर्शित करताच निर्वासितांनी लॉरीजवर हल्ला केला. त्यांच्याजवळ लोखंडाच्या सळया आणि कुऱ्हाडी होत्या. पोलिसांनी स्वसंरक्षणार्थ बंदुका चालविल्यावर हे निर्वासित अधिकच चेकाळले. त्यांनी पोलिसांना बेदम मारले व त्यांच्या गाडीला आग लावून दिली. प्रत्यक्षात चौकशी केल्यावर असे कळले की, पोलिसांनी गोळीबार केला तेव्हा लहान मुले, स्त्रिया व म्हातारी माणसे यांचे भान ठेवले नाही व आठ जणांना मारून टाकले. शिवाय स्वतःची बाजू सिद्ध करण्याच्या उद्देशाने स्वतःच पोलिसगाडी पेटवून दिली, असे निर्वासितांनी ठासून सांगितले.

मुख्यमंत्री ज्योति बसू ह्यांना हे निर्वासित म्हणजे प्रथमपासूनच एक डोकेदुखी वाटत होती. आपल्या राज्याच्या प्रगतीमध्ये हा एक फार मोठा अडथळा आहे, असे ते उघड उघड बोलत असत. अनायासे हा जथा दंडकारण्यात परत जात असल्याचे पाहून त्यांना हायसेच वाटले असेल. निर्वासित-पोलिस मारामारीविषयी बोलताना श्री. बसूंनी पोलिसांचीच बाजू बरोबर असल्याचे मत अप्रत्यक्षपणे व्यक्त केले व दोष निर्वासितांवर ठेवला. सप्टेंबरपर्यंत सर्व निर्वासित एकदाचे इथून जातील असा अंदाज आहे.

महाराष्ट्रातली मंडळी म्हणतात, हे निर्वासित वास्तविक बंगाली. त्यांनी बंगालमध्येच खरे तर राहायचे. बंगालनेच त्यांचा भार उचलायचा. त्यांना सांभाळायचे. दंडकारण्यात का म्हणून पाठवतात त्यांना ?

ह्या निर्वासितांनी येथेही राहून पाहिले. येथे आपली अधिकच दुर्दशा होत आहे हे दिसल्यावर ते पुन्हा दंडकारण्यात जाण्यास तयार झाले. स्वतःच्या घरी किंवा मायभूमीतच माणूस जेव्हा परका होतो तेव्हा त्याची अशीच ससेहोलपट होत असते. आता हे निर्वासित कायमचे निर्वासितच राहणार आणि त्यांच्या पुढच्या पिढ्याही निर्वासित नावाने जगणार ! असे न होवो की निर्वासितांचाही एक वेगळा प्रांत बनविण्याचा प्रसंग यावा. तीस वर्षांनंतरही निर्वासितांचा प्रश्न तसाच कायम राहणे हा भारताच्या नशिबाचाच एक कलंक आहे कधीही धुऊन न निघणारा, असे कोणी म्हटले तर ती अतिशयोक्ती होऊ नये !

□

परराष्ट्रीय घडामोडी । चंद्रशेखर पुरंदरे

# बोलिव्हिया

## आखलेल्या निवडणुका, बेतलेले निकाल

९ जुलैला बोलिव्हियात मजेशीर निवडणुका पार पडल्या. या अध्यक्षीय निवडणुकांसाठी प्रमुख दोन उमेदवार उभे होते. जेव्हा मतमोजणी पूर्ण झाली तेव्हा असे लक्षात आले की, एकूण मतदान एकूण मतदारांच्यापेक्षा पन्नास हजारने जास्त झालेले आहे. म्हणजेच शंभर टक्क्यांहून जास्त मतदान करून बोलिव्हियाने एक जागतिक विक्रम प्रस्थापित केला. अर्थातच निवडणुकांत फार मोठ्या प्रमाणावर लांडीलबाडी करण्यात आल्याचे स्पष्ट झाले. ती लांडीलबाडीही धूर्तपणे न करता पाकिस्तानच्या भुट्टोच्या निवडणुकीसारखीच पोरकट पद्धतीने करण्यात आली.

### निवडणूक

बारा वर्षांनी प्रथमच बोलिव्हियामध्ये सार्वत्रिक निवडणुका होत होत्या. या वेळी बोलिव्हियाच्या हवाई दलाचा प्रमुख जनरल ज्युआं पेरेदा हा सरकारी पक्षातर्फे अध्यक्षीय उमेदवार होता. त्याच्याविरुद्ध प्रमुख उमेदवार हेर्नान सिलेस झुआझो उभा होता. हा १९५५-६० च्या दरम्यान बोलिव्हियाचा अध्यक्ष होता. १९६० साली तो निवडणूक हरला. ५५-६० ही वर्षे बोलिव्हियाला अतिशय बिकट गेलेली होती. त्या असंतोषाला तो १९६० मध्ये बळी पडला; परंतु यानंतरच्या काळात त्याने राजकीय वजन बरेच वाढविले आणि सध्या ज्युआं पेरेदाला बरोबरीने झुंज देऊ शकेल अशी ही एकच व्यक्ती होती. त्यामुळे पराभवाच्या आशंकेने ग्रासलेल्या पेरेदामहाशयांनी निवडणूक आपल्या बाजूने फिरेल अशी दक्षता घेतली; पण १०० टक्क्याहून अधिक मतदान ही गोष्टच इतकी हास्यापद होती, की प्रकरण कोर्टात जाणे साहजिकच होते.

वस्तुतः लॅटिन अमेरिकेमध्ये निवडणुकांचे निकाल फिरविणे ही काही असामान्य गोष्ट नाही. ते नित्याचेच आहे. या वेळच्या बोलिव्हियातल्या या निवडणुकांना प्रसिद्धी मिळण्याचे कारण म्हणजे आंतरराष्ट्रीय निरीक्षकांची उपस्थिती. त्यामुळे पेरेदाची जगभर बदनामी झाली. हेर्नान झुआझोने लगेच सरकार पक्षावर फसवणुकीचा आरोप केला. १९ जुलैला या प्रकरणावर कोर्टाने निकाल दिला. त्यात पेरेदा आघाडीवर असल्याचे म्हटले; पण त्याच्याच अनुयायांनी ही हातचलाखी केली असा आरोप ठेवला. मतदारांना दहशतीने दडपणाखाली मतदान करायला भाग पाडले असाही आरोप पेरेदाच्या अनुयायांवर ठेवला. या आगीत तेल म्हणून हेर्नान झुआझो पेरेदाच्या या कृत्याविरुद्ध निषेध व्यक्त करायचा म्हणून बोलिव्हियाची राजधानीला पाझ येथे उपोषणाला बसला.

### पेरेदाच्या हालचाली

ही धमाल चालू असताना अर्थातच पेरेदाची जगभर छी:थू होत होती. तेव्हा जरा तरी प्रतिष्ठा सावरावी म्हणून त्याने कोर्टाला निवडणूक रद्द समजावी असा आदेश देण्याची विनंती केली. ती मंजूर होऊन नवीन निवडणुका सहा महिन्यांच्या आत घेण्याची तरतूद करण्यात आली; पण १९ जुलैला हा निकाल दिला आणि २१ जुलैला पेरेदाला पाझहून ३०० मैल पूर्वेला सान्ताक्रूझ या शहरी गेला आणि तिथून त्याने आपण अध्यक्ष असल्याची घोषणा केली. यामुळे एकच खळबळ माजली. बोलिव्हियाचा तोपर्यंतचा अध्यक्ष ह्युगो बांझर याने पेरेदा अध्यक्ष नसून मीच अध्यक्ष आहे, असे रेडिओवरच्या तीन मिनिटांच्या भाषणात सांगितले आणि पेरेदाला शान्तता प्रस्थापित करण्यासाठी सरकारला मदत करण्याचे आवाहन केले. त्या एक-दोन दिवसांत बांसरच्या प्रस्थापित राजवटीची सरशी होत होती; परंतु लष्कराच्या जोरावर लवकरच पेरेदाने प्रथम पूर्व बोलिव्हिया नंतर उर्वरित भागावर अंमल बसविला आणि आपण नव्या निवडणुकांपर्यंतचे काळजीवाहू सरकार स्थापन केल्याचे जाहीर केले. वस्तुतः या घाईची फारशी जरुरी नव्हती. कारण ह्युगो बांझरची मुदत ६ ऑगस्टला संपतच होती आणि त्यानंतर लष्कराकडेच सत्ता गेली असती; पण हेर्नान झुआझोला मिळणारा वाढता पाठिंबा पाहून पेरेदाने सत्ता हस्तगत करण्याचा निर्णय घेतला.

देशांत लगेच आणीबाणी जाहीर करण्यात येऊन मूलभूत हक्क निलंबित करण्यात आले. प्रामुख्याने डाव्या विद्यार्थी चळवळींवर बंदी घालण्यात आली. देशभर कर्फ्यू पुकारण्यात आला आणि तीनहून अधिक व्यक्तींना एकत्र येण्यास मनाई करण्यात आली. पेरेदाने आता आपले आसन बळकट केले.

२६ जुलैला पहिल्या कॅबिनेट मीटिंगनंतर सर्व राजकीय कैद्यांना मुक्त करण्याचा निर्णय त्याने जाहीर केला. हा निर्णय अर्थातच प्रतिमा उजळ करण्याच्या प्रयत्नाचा एक भाग आहे. लवकरच लोकशाहीकडे वाटचाल सुरू होईल, असे लष्करशहांचे नैमित्तिक झालेले आश्वासनही त्याने दिले आणि एकूण सगळे आलबेल आहे असा आभास निर्माण केला; पण जेवढ्या सुलभतेने व निर्विघ्नपणे हे सत्तान्तर झाले असे दाखविण्याचा पेरेदाचा अट्टाहास आहे, तितक्या सहजतेने ते झालेले नाही. त्याच्या विरुद्धच्या असंतोषाचा पहिला उद्रेक ला पाझच्या ईशान्येला युंगस खोऱ्यामध्ये २५ जुलैला झाला. कोरिपाता या नावाने हा प्रदेश ओळखला जातो. तिथल्या शेतकऱ्यांनी रस्त्यांवर मोठे अडथळे टाकून वाहतूक बंद पाडली. लष्कराने ताबडतोब हस्तक्षेप करून काही शेतकऱ्यांना ठार मारले व बऱ्याच जणांची घरे जाळून परिस्थिती काबूत आणण्याचा प्रयत्न केला.

सरकारी वृत्तानुसार या विभागात काम करणाऱ्या इंजिनिअर्सच्या तुकडीवर अतिरेकी गनिमांनी हल्ला केला आणि त्यांना ठार

मारले. या दरम्यान थोड्या-फार चकमकीही झाल्या.

ह्या विभागात 'कोका' या वनस्पतीचे उत्पादन होते. या पिकाच्या वाटपावरून गोंधळ झाला असे माहिती मंत्री फाउस्तिनो रिको तोरो याने सांगितले; परंतु अशाच प्रकारच्या चकमकी कोरिपाताखेरीज कोरोइको, आरापाता, उत्तर युंगस आणि दक्षिण युंगसमध्ये लष्कर व शेतकरी यांच्यात उडाल्याचे अनधिकृत वृत्त आहे. त्या प्रदेशातील लोकांनी सामूहिक उठाव करण्याचाही अयशस्वी प्रयत्न केला.

## परिणाम

१) पेरेदा उजव्या विचारसरणीचा आहे. हेर्नान झुआझो डाव्या विचारसरणीचा आहे. १९७० साली बोलिव्हियात डाव्या अतिरेकांचे अखेरचे उद्रेक झाले. त्यानंतर आजतागायत त्यांच्याकडून फारशी हालचाल नाही. शेतकऱ्यांच्या पेरेदाला असणाऱ्या विरोधातून परत जर डाव्यांची चळवळ सुरू झाली तर ला पेरेदाला प्रकरण जड जाईल.

२) पेरेदा जरी उजव्या विचारसरणीचा असला तरी त्याने निवडणुका गुंडाळून सत्ता संपादन केली आहे. बोलिव्हियाच काय, एकूणच दक्षिण अमेरिकेतील राजकीय वारे वॉशिंग्टनच्या मर्जीनुसार फिरते. कार्टर सत्तेवर आल्यापासून त्यातल्या त्यात अनैतिक पद्धतींचा धिक्कार केला जातो. म्हणून अमेरिकेची खप्पा मर्जी होण्याची शक्यता आहे. द. अमेरिकेतच या वर्षी डॉमिनिकन रिपब्लिकच्या लष्कराने प्रमुख विरोधक अँटोनिओ गुझमानची निवडणूक ताकदीच्या जोरावर हाणून पाडण्याचा प्रयत्न केला होता. त्याबद्दल कार्टरने अप्रसन्नता व्यक्त केली होती. वॉशिंग्टनची अशी गैरमर्जी बोलिव्हियाला परवडण्यासारखी नाही आणि एकूण जागतिक मताचा अंदाज घेता लवकर निवडणुका घ्यायला परिस्थिती भाग पाडणार असे दिसते.

३) सहा महिन्यांत जर निवडणुका झाल्या, तर विरोधी पक्षाला खूपच आशादायक निकाल लागतील. तसे झाले तर लॅटिन अमेरिकेला नवीन राजवटीचा अनुभव प्रथमच येईल आणि याचा परिणाम बोलिव्हियाच्या दक्षिण सीमेला लागून असणाऱ्या चिली आणि अर्जेन्टिनावर झाल्याखेरीज रहाणार नाही. या दोन्ही राष्ट्रांत सध्या हुकूमशाहीच चालू आहे.

एकूण पहाता, पेरेदाच्या अविवेकी चालीची फळे त्याला लवकरच चाखायला मिळणार असे दिसते. □


## धोका ! धोका ! ! धोका ! ! !

### चाणाक्ष भगिनींना नम्र विनंती

सध्याच्या रोजच्या वर्तमानपत्रातील सुपर सेलच्या जाहिराती पाहून त्यास बळी पडू नका. आपली ही निव्वळ फसवणूक आहे. साड्या खरेदी करतेवेळी आपण निश्चित मनाने निःसंशय "अनुपमा" ह्या भव्य अशा मोठ्या दुकानामध्येच खरेदी करा.

कारण ! अनुपमामध्ये हिन्दुस्थानातील सर्व मिलचा, पेठांचा भरपूर स्टॉक असून फॅक्टरी प्राईजमध्ये व मुंबईच्या होलसेल मार्केटच्या भावात सर्व प्रकारच्या साड्या खरेदी करा.

जाहिरातीस बळी न पडता आपण एकदा या, पहा, मगच खरेदी करा. आम्ही गॅरंटी देऊ शकतो; इतर सेलवाले देऊ शकणार नाहीत. आपली फसगत होऊ नये म्हणून हे निवेदन.

| | | | |
|---|---|---|---|
| प्युअर सिल्क बनारशी शालू | रु. १८० | सेमी टेरीन | रु. ३० |
| कांजीवरम् सिल्क जरी बॉर्डर | रु. ८० | ६४४ प्रिंटेड | रु. ६५ |
| प्रिंटेड कांजीवरम् सिल्क | | व प्लेन ६४४ | रु. ६० |
| वुइथ ब्लाऊज पीस | रु. १३० | जरी बॉर्डर गढवाल | रु. ३० |
| प्रिंटेट कांजीवरम् सिल्क | | अमेरिकन प्रिंटेड | रु. ४५ |
| विदाऊट ब्लाऊज पीस | रु. ११५ | प्युअर अमेरिकन प्रिंट १८१७ | रु. ७० |
| नारायण पेठ प्युअर सिल्क | रु. २२० | ९ वार प्रिंटेड साडी | रु. ३० |
| नारायण पेठ टेंपल | रु. २४५ | ९ वार सुती साडी | रु. २८ |
| गार्डन अमेरिकन साटीन पट्टा | रु. १३५ | ९ वार प्युअर महेश्वरी | |
| गार्डन अमेरिका सिफॉन | रु. १५० | सुती साडी | रु. ५० |
| हँड प्रिंट प्युअर कोटा | रु. ४५ | ६ वार कांजीवरम् साडी | |
| प्रिंटेड प्युअर सिल्क | रु. ८५ | जरी बुट्टयाची | रु. ४० |
| बेंगॉल स्वामी साडी | रु. २४ | गार्डन कोटा वुइथ एंब्रायडरी | |
| गर्भरेशमी इरकल साडी | रु. २९ | व पॅच | रु. ४० |

बनारस शालू व कांजीवरम् सिल्क निम्म्या किमतीत मिळतील.

वरील साड्या आपणास निश्चितच स्वस्त किमतीत 'अनुपमा'मध्ये मिळतील.

टीप—सिनेस्टार राखी या नटीने परिधान केलेल्या त्रिशूल चित्रपटातील प्युअर प्रिंटेड कांजीवरम् सिल्कच्या प्रचंड साड्या पहावयास मिळतील.

या सर्व साड्या खरेदी करताना अनुपमा हे नाव लक्षात ठेवा. आमची इतरत्र कोठेही शाखा नाही.

# अनुपमा

आपले नम्र,
**शिंदे–पाटील**

६३० न्यू सदाशिव पेठ फडतरे, चौक,
लक्ष्मी रोड, पुणे ३०

नवीन डिझाइन्समधील राहिलेली १ किंवा २ साड्या अगदी कमी दरात मिळतील.

कथा

# हरवला आहे !

मधुकर जयवंत काकडे

काही तरी निश्चय करूनच त्याला उठायचं होतं; पण तसं घडलं नाही. तो हताश होऊनच उठला. गजबजलेल्या लक्ष्मी रोडवर त्याला एकच दुकान बंद दिसलं होतं आणि त्याच्या पायरीवर तो किती तरी वेळ बसला होता.

त्यानं चालायला सुरुवात केली. नव्यानं अचानकच त्याला एका दुकानावर पाटी दिसली. 'सतीश शू मार्ट.' त्याचा चेहरा आनंदानं उजळला. संबंध पुण्यामध्ये त्याला जास्त जवळचं तेवढंच नाव वाटलं होतं. काही वेळ हरखून गेलेल्या चेहऱ्यानं त्या पाटीकडे पाहिलं अन् ओठ मिटून पुन्हा तो चालू लागला तोच त्याच्या हातांना अचानक स्पर्श झाला. त्यानं मागं पाहिलं. त्याच्या वडिलांच्याच वयाचा, तसंच दुटांगी धोतर अन् काळी टोपी घातलेला मनुष्य उभा होता.

'तुम्ही मिस्टर सुधीर कुलकर्णीच ना ?' त्या माणसानं आपले चांदीचे दात दाखविणारं हास्य करीत त्याला विचारलं.

'अं...' तो अस्पष्ट विव्हळला.

'तुम्हीच ना सुधीर कुलकर्णी ?' त्यानं त्याचा हात दाबीत अन् हसत पुन्हा विचारलं.

'अं...नाही. मी... माझं नाव...'

'माफ करा.' असं म्हणत आणि तोंडातून बाहेर पडणारं हास्य पुन्हा झटकन् आत घेत तो पुढे चालू लागला.

सतीशनं थोड्याश्या वाढलेल्या दाढीत जोरात खाजवलं. 'तो माणूस जरा ऐकून घेता तर ?' सतीश या कल्पनेनेसुद्धा जरासा खुलला. तो माणूस जरा जरी थांबला असता तरी सतीश लगेचच त्याला सांगणार होता, 'अहो, माझं नाव सतीश पारसमल पारेख. माझा फोटो आलाय आजच्या सर्व वर्तमानपत्रांमध्ये ! मला मुंबईला पोचवाल तर रोख पाचशे रुपये मिळतील तुम्हाला. जाण्या-येण्याचा खर्चसुद्धा ! वाटल्यास मी आताच शंभर रुपये देतो तुम्हाला; पण मला माझ्या घरी नेऊन पोचवा. मी हरवलोय !'

सतीशला शेवटच्या वाक्यानं थोडंसं हसविलं. खिन्नपणाने तो हसला. त्याच्या चालण्यातला वेग त्याला चौक पाहून जाणवला. त्यानं मागं पाहिलं. केवढा मोठा 'रोड' दिसत होता. त्यालाच चिकटलेला फुटपाथ अन् त्यावरून चालणारी स्वत:त हरवलेली माणसं. सायंकाळचे पाच वाजत आले असावेत.

चौक ओलांडून जरासं पुढं आल्यावर त्याला एक हॉटेल दिसलं. भूक अजिबात नव्हती. मघाशीच तर त्यानं एका हॉटेलात भरपेट खाल्लं होतं; पण हॉटेलमध्येही माणसं असतात, वर्तमानपत्रंही असतात एवढाच विचार त्यानं केला अन् तो त्या हॉटेलमध्ये शिरला.

हॉटेलच्या काउंटर शेजारीच असलेल्या टेबलापाशी तो बसला. त्याच्यासमोरच एक उग्र मिशा असलेला अन् लुंगी नेसलेला माणूस त्याला दिसला. वर्तमानपत्र वाचण्यात गढून गेला होता तो. सतीशकडे वर्तमानपत्राची जी बाजू होती त्यावर एक कॉलम होता 'दु:खद निधन.' त्याच्याएवढ्याच एका तरुणाचा फोटो छापला गेला होता, कॉलमच्या सुरुवातीलाच. 'याच्या जागी आपलाच फोटो आहे,' असं किती तरी वेळ स्वत:शीच म्हणत तो फोटोकडे पहात होता; पण त्याला फोटोतील परकेपणा स्पष्टपणे जाणवत होता. 'उद्याच्या वर्तमानपत्रांमध्ये आपला फोटो यायला हवा. 'निधन' अशा शीर्षकाखाली अन् मग पप्पांनी तो पहायला हवा. त्याशिवाय माझी किंमत नाही कळायची त्यांना,' असा विचार करीतच त्यानं मिशावाल्या माणसानं खाली ठेवलेला पेपर उचलला.

त्याचा फोटो होता. त्याचा शोध लावणाऱ्याला पाचशे रुपये इनाम पण होते. 'ताबडतोब घरी ये' अशी खाली कळकळीची विनंती सुद्धा. सतीशनं तो फोटो मिशावाल्या माणसाला दिसेल अशा बेतानं पेपर पुन्हा टेबलावर ठेवला. तो मिसळ खाण्यात हरवून गेला होता.

'हल्ली मुलं घरातून का पळून जातात याचा विचारच करीत नाही कोणी !' तो मिशावाल्या माणसाच्या रोखानं जोरात पुटपुटला. त्यानं सतीशकडं जोरात रोखून पाहिलं अन् तेवढ्यात मिसळीमध्ये त्याला लागलेला खडा त्याच्या जबरदस्त दातांखाली 'कडकड' आवाज करीत फुटला. त्यानं जोरात वेटरला हाक मारली अन् मग थोडा वेळ मस्तक बधिर करणाऱ्या शिव्या आणि 'माफ करा साहेब ! दुसरी मिसळ आणतो.' याव्यतिरिक्त सतीशला काहीच ऐकू आले नाही. वेटर निघून गेला अन् जाताना टेबलावरील पेपरही घेऊन गेला.

मिशावाल्यानं पुन्हा एकदा सतीशकडे रोखून पाहिलं. सतीशनं ओशाळून पुढ्यातला चहा संपविला अन् तो बाहेर पडला.

पुढं तो केवळ चालत राहिला. त्याचं त्यालाच उमगलं नाही. पुणं त्याला पूर्णपणे अनोळखी होतं. फुटपाथनं पुढे पुढे जात रहाणं एवढंच तो गेले चार दिवस करीत होता. चार दिवसांपूर्वी तो पुण्यात दाखल झाला तेव्हा त्याला किती तरी वेगळं वेगळं वाटत होतं. स्वत:च्या तत्त्वांसाठी घर लाथाडून आलो, याचं समाधान त्यानं किती तरी दारूच्या बाटल्या पिऊन व्यक्त केलं होतं. दोन दिवस लॉजवर मजेत गेले होते.

कालपासूनच तो जरा अस्वस्थ व्हायला लागला होता. केवळ दीडशे रुपये शिल्लक राहिले होते. मित्र-मैत्रिणींची आठवण येत होती पुण्यात त्याचं कोणीही नव्हतं.

तो मुंबईला स्वत: जायलाही तयार नव्हता. तो त्याचा अपमान होता. तत्त्वांकरिता घराचा त्यानं त्याग केला होता. स्वत:हून घरी जाण्यास तो तयार नव्हता. कुणी तरी त्याला घेऊन जाणं आवश्यक होतं. सन्मानानं. आग्रह धरून. मग मुंबईत त्याच्या त्यागी वृत्तीचं कौतुक होणार होतं. कदाचित त्याचा फोटोही प्रसिद्ध होणार होता. त्याला पुणं असह्य व्हायला लागलं होतं. मुंबईत पोचणं आवश्यक होतं.

आणि आज तर तो पुण्यातल्या फुटपाथवरून फिरत होता. कोणी तरी आपल्याला ओळखून मुंबईला न्यावं म्हणून केवळ !

एका ओरडण्यानं, त्याला त्याच्या विचारातून जागं केलं. एका बस स्टॉपपाशी एका गाडी ओढणाऱ्या हमालाला कडक कपड्यातले चार–पाच तरुण, लाथा-बुक्क्यांनी मारीत होते. तो फाटका हमाल दीनवाणा चेहरा करून फक्त 'मी नाही, मी नाही,' एवढंच म्हणत होता. सतीश झपाट्यानं पुढं निघाला अन् अधिक वेगानं पुढं चालू लागला.

पुन्हा त्याला एक बस स्टॉप दिसला. मोगऱ्याच्या वेण्या केसांत घातलेल्या दोन तरुणी तिथे उभ्या होत्या. सेंटच्या वासामुळं संपूर्ण स्टॉप उल्हसित झाल्यासारखा दिसत होता. सतीश त्या तरुणींशेजारी जाऊन उभा राहिला. अर्ध्या तासानं बस आली. सतीशला त्या तरुणींशेजारीच बसायला जागा मिळाली. 'दोन स्टेशनं' त्यांपैकी एक तरुणी म्हणाली. 'एक स्टेशन' सतीशनंही कंडक्टरला फर्मावलं. दोघींपैकी एकीनंही सतीशकडे पाहिलं नाही.

स्टेशनवर त्या दोघीही उतरून क्षणार्धात दिसेनाशा झाल्या. सतीशने बरंच पाहिलं पण त्याला त्या कोठेच दिसल्या नाहीत. तो पुन्हा चालू लागला. पुन्हा घर आठवायला लागलं.

'आपले पप्पा फार स्वार्थी आहेत,' तो मनाशीच पुटपुटला. निव्वळ पैसा पाहिजे त्यांना. त्यांनी आयुष्यभर मिळविला तो थोडा आहे का? पुन्हा मीसुद्धा कशाला त्यांच्या किचकट धंद्यात पडू ?

आपण समाजाचंही काही देणं लागतो. समाजाच्या ऋणाची आपण परतफेड करायला हवी, अशी त्याची विचारधारणा त्याच्या बऱ्याच मित्र-मैत्रिणींशी चर्चा केल्यानंतर झाली होती अन् त्यामुळेच समाजसेवेपुढे 'पैसा' हा त्याला कवडीमोल वाटत होता. समाजाकरिता तो स्वतःची सर्व इस्टेटही विकायला तयार होता.

त्याच्या सर्व मित्र-मैत्रिणींनी या व्रताच्या प्रसाराकरिता एक कमिटी स्थापन केली होती. सतीश कमिटीचा अध्यक्ष होता. सतीशच्या औदार्यावर सर्व सभासद खुष होते.

कमिटीची मीटिंग आठवड्यातून किमान पाच दिवस तरी असायची. सतीशच्या घरीच बहुधा असायची. कधी कधी मोठ्या हॉटेलवरही व्हायची. रात्र-रात्र 'समाजसेवेच्या' कार्यक्रमावर चर्चा चालायची. विदेशी दारू, सिगारेट्स आणि डिनर हे नेहमीचे कार्यक्रम रात्रीतून सलग असे चालू असायचे.

आज गरिबांवर होणारा अन्याय, दुर्बल घटकांचा होणारा अतोनात छळ व याच दुर्बलांच्या महिलांची होणारी विटंबना आपण स्वतः जातीनं जाऊन थांबविली पाहिजे, आपण शक्य तितक्या लवकर या आखाड्यात उतरले पाहिजे, या सतीशच्या वक्तव्यावर कुणाचाच आक्षेप नसायचा. कित्येकदा या कमिटीतले सभासद समाजातील अन्यायाचं वर्णन ऐकताना रडायचे सुद्धा !

सतीशच्या पप्पांचे व त्याचे दररोज यावरून खटके उडत होते. दररोजच्या मीटिंगकरिता होणारा हजार-बाराशे रुपये खर्च अध्यक्ष या नात्याने सतीशच करीत होता व सतीशला त्यात वावगं असं काही वाटतही नव्हतं.

'सतीश पारसमल पारेख' सतीशनं ऐकलं आणि शॉक बसल्यासारखा विचारातून तो जागा झाला अन् तो ऐकू लागला. रेडिओ तो घरातून निघून गेल्याचं सांगत होता. 'उंची १७५ सेंटिमीटर' रेडिओ सांगत होता; पण सतीश तिथे न थांबता पुढे सरकला. त्याच्या लक्षात आलं होतं इथं सेंटिमीटरचे फुटमध्ये रूपांतर करायला कुणाला वेळ नाही म्हणून.

पुढच्याच चौकात एका सार्वजनिक टी. व्ही. पुढे लोकांनी गर्दी केली होती. सतीश गर्दीत सामील झाला आणि कार्यक्रम सुरू झाला 'यांना आपण पाहिले आहे काय ?' पहिलाच फोटो सतीशचा होता. फोटो दाखविताच जमलेल्या सर्व लोकांनी 'हयहय' अशी ओरडायला सुरुवात केली. कित्येकांनी 'ये भडव्या, ये मवाल्या, ये चोरा' अशा अशा शिव्याही दिल्या. सतीश गर्दीत जरासा चुळबुळला आणि दुसरा फोटो लोकांसमोर आला. पुढल्या प्रत्येक फोटोला लोकांनी पहिल्या फोटोइतकाच प्रतिसाद दिला.

सतीश गर्दीपासून दूर झाला. आता त्याला पुण्यात रहाणं अधिकाधिक अवघड वाटू लागलं होतं. स्टेशन जवळच होतं; पण स्वतःहून घरी जाण्यास त्याचा पूर्वीइतकाच विरोध होता. असह्य होऊन रस्त्यातल्या एका माणसाला त्यानं थांबविलं. 'साहेब, मी हरवलो आहे.' सतीश म्हणाला.

'काय ?' चेहरा रुंद करून त्या माणसानं विचारलं. 'मला मुंबईला पोचवा. तुम्हाला पाचशे रुपये मिळतील. वाटल्यास आताच शंभर देतो.' एका दमात सतीश उत्तरला.

'तुम्हाला वेड लागलंय काय ?' त्या माणसानं पुन्हा विचारलं.

'नाही साहेब ! मी हरवलोय!' पुन्हा केविलवाणा सतीश उतरला.

त्या माणसानं सतीशकडे थोडा वेळ पाहिलं अन् 'साहेऽऽब' अशी जोरात हाक मारली. खाकी कपड्यातील एक पोलिस तीरासारखा तिकडे धावला.

'यांना सांग तुझी काय अडचण आहे ते.' त्या माणसानं सतीशला सांगितलं अन् तो निघून गेला. त्या पोलिसानं खास आवाजात 'चला' असं म्हटलं अन् चक्रावलेला सतीश त्या पोलिसामागं चालू लागला.

□

नॅशनल बुक ट्रस्ट आणि मराठी ग्रंथप्रकाशक संघटना यांच्या विद्यमाने पुणे येथे दिनांक २९।३०।३१ जुलैला झालेल्या परिसंवादात वाचण्यात आलेला निबंध.

# सार्वजनिक क्षेत्राचे मराठी ग्रंथप्रकाशन व्यवसायातील स्थान

चिं. स. लाटकर (कल्पना मुद्रणालय, पुणे)

पुढील दहा वर्षांत मराठी प्रकाशनाची वाटचाल कशी असावी या प्रश्नाची चर्चा करण्यासाठी आयोजित केलेल्या परिसंवादाचा आजचा तिसरा व शेवटचा दिवस आहे. स्वातंत्र्योत्तर काळात मराठी प्रकाशन–व्यवसायासंबंधी सरकारी स्तरावरून करण्यात आलेला हा पहिलाच विधायक उपक्रम आहे असे मला वाटते. हा उपक्रम आयोजित केल्याबद्दल 'नॅशनल बुक ट्रस्ट'चे प्रथम अभिनंदन करणे आवश्यक आहे.

सार्वजनिक क्षेत्राचे मराठी प्रकाशन–व्यवसायात कोणते स्थान असावे या विषयावर परिसंवादात भाग घेण्याबाबत माझी असमर्थता मी परिसंवादाच्या संचालकांना कळविली होती. त्याची दोन कारणे होती. मी व्यवसायाने गेली २५ वर्षे मुद्रक आहे. प्रकाशन–व्यवसायाचा मला अनुभव नाही आणि पुढील दशकात मराठी प्रकाशन करण्याचा माझा विचार नाही. त्यामुळे मराठी ग्रंथ-प्रकाशन-व्यवसायाबद्दल आपण बोलणे हे कितपत योग्य ठरेल याबद्दल मी साशंक होतो, आजही आहे. दुसरे म्हणजे सार्वजनिक क्षेत्रात मराठी ग्रंथ–प्रकाशनासंबंधी जे कार्य झालेले आहे त्याचे यथार्थ मूल्यमापन करण्याच्या दृष्टीने जी आकडेवारी आहे ती या थोड्या अवधीत जमा करणे हे शक्य नव्हते. त्यामुळे मी मांडणार असलेल्या विषयाच्या प्रतिपादनात काही त्रुटी राहणे हे अपरिहार्य झाले आहे याची मला जाणीव आहे.

केंद्र व राज्य स्तरावर मराठी ग्रंथ–प्रकाशनाच्या सार्वजनिक क्षेत्रात निरनिराळ्या संस्था कार्य करीत आहेत. निरनिराळ्या भारतीय भाषातील, तसेच जगातल्या अन्य भाषांतील उत्तमोत्तम ग्रंथांचा परिचय मातृभाषेत करून देण्याच्या उद्देशाने स्वातंत्र्यानंतर लगेचच म्हणजे १२ मार्च १९५४ रोजी साहित्य अ‍ॅकॅडमीची स्थापना करण्यात आली. त्या वेळचे भारताचे पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरू हे या अ‍ॅकॅडमीच्या अध्यक्षस्थानी होते. मराठी ग्रंथ-प्रकाशनाच्या दृष्टीने सार्वजनिक क्षेत्रातील हे पहिले पदार्पण सर्वसामान्य जनतेत वाचनाची गोडी निर्माण व्हावी म्हणून बरोबर २१ वर्षांपूर्वी म्हणजे १ ऑगस्ट १९५७ रोजी डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन यांनी नॅशनल बुक ट्रस्टची स्थापना केली. महाराष्ट्र राज्याची स्थापना झाल्यानंतर १९ नोव्हेंबर १९६० रोजी महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळाची स्थापना झाली. भारतीय ज्ञानपीठाने आपला कारभार १९६६ सालापासून सुरू केला. पब्लिकेशन्स डिव्हिजन आणि महाराष्ट्रात प्रिंटिंग अ‍ॅन्ड स्टेशनरी विभाग मराठी ग्रंथ-प्रकाशनाच्या क्षेत्रात गेली काही वर्षे काम करीत आहे. विश्वविद्यालयीन स्तरावरील शिक्षणाचे माध्यम मराठीत करण्याचे उद्दिष्ट साध्य करण्यासाठी 'महाराष्ट्र विद्यापीठ ग्रंथनिर्मिती मंडळा'ची स्थापना १९ मार्च १९६९ रोजी करण्यात आली. महाराष्ट्र राज्यातील मराठी ग्रंथ-प्रकाशन व्यवसायावर दूरगामी परिणाम घडवून आणणारी सार्वजनिक क्षेत्रातील महत्त्वाची घटना म्हणजे दि. २७–३–१९६७ रोजी करण्यात आलेली पाठ्यपुस्तक मंडळाची स्थापना ही आहे. सार्वजनिक क्षेत्रातील आणखीही एका संस्थेची नोंद घेणे आवश्यक आहे. १९७२ साली राजा राममोहन रॉय ट्रस्टची स्थापना झाली. ही संस्था ग्रंथ-प्रकाशन करणारी नसून प्रकाशित ग्रंथांच्या प्रसारासाठी ती निर्माण झालेली आहे. याशिवाय शिक्षणशास्त्र संस्था, डायरेक्टोरेट ऑफ अ‍ॅडल्ट एज्युकेशन इ. संस्था मराठी ग्रंथप्रकाशनाच्या सार्वजनिक क्षेत्रात कार्य करीत आहेतच.

सार्वजनिक क्षेत्रात मराठी ग्रंथ-प्रकाशनाच्या दृष्टीने जे कार्य चालू आहे त्या कार्याचे त्याच्या गुण-दोषासकट मूल्यमापन केल्याशिवाय पुढील दशकात कोणते बदल घडून आले पाहिजेत याचा विचार करता येणार नाही, असे मला वाटते. सार्वजनिक क्षेत्रात कार्य करीत असलेल्या ज्या संस्थांचा मी वर उल्लेख केला आहे त्यांच्या कार्याचे स्वरूप इतके भिन्न आहे की, त्यांचा एकत्रित विचार करता येत नाही. प्रत्येकाचा विचार स्वतंत्रपणे करावा लागेल. नॅशनल बुक ट्रस्टने स्वतःच्या कार्याबद्दल मूल्यमापन करण्याच्या दृष्टीने या परिसंवादाची आखणी केली म्हणून मुख्यतः त्याबद्दल विचार करण्याचे मी ठरविले आहे.

'नॅशनल बुक ट्रस्ट' या स्वायत्त संस्थेची स्थापना करण्याचा मूळ उद्देश उत्तमोत्तम साहित्य अल्प किमतीत प्रसिद्ध करून देशातील सामान्य जनतेच्या ठिकाणी वाचनाची गोडी निर्माण करणे हा आहे. बुक ट्रस्टच्या वतीने १९७७ साली जी ग्रंथसूची प्रकाशित करण्यात आली आहे तिच्या सुरुवातीला हा मूळ उद्देश देण्यात आला आहे. गेल्या २१ वर्षांत नॅशनल बुक ट्रस्टने एकूण १७३४ पुस्तके प्रकाशित केली आहेत. त्यांपैकी मराठी पुस्तकांची संख्या अवघी १४० आहे. टक्केवारीच्या भाषेत बोलावयाचे झाले तर फक्त ८ टक्केच पुस्तके मराठी भाषेत छापली आहेत. पृष्ठसंख्येच्या भाषेत ही आकडेवारी दिली तर असे म्हणता येईल की, दरवर्षी ९०० पृष्ठे या यंत्रणेमार्फत छापून प्रकाशित करण्यात आली आहेत.

मराठी भाषेतील बुक ट्रस्टच्या ग्रंथांची संख्या व त्यांची व्याप्ती

इतकी कमी का, असा प्रश्न निर्माण करण्यापूर्वी एका गोष्टीची तुलना अवश्य करावीशी वाटते. ट्रस्टने याच काळात इंग्रजी भाषेत २७३ म्हणजे १५ टक्क्यांहूनही अधिक पुस्तके प्रकाशित केली आहेत. सामान्य जनतेत वाचनाची गोडी निर्माण करण्यासाठी करण्यात आलेला हा प्रयोग अनाकलनीय आहे, न पटणारा आहे. या पुढील दहा वर्षांत एकही पुस्तक इंग्रजी भाषेत प्रसिद्ध केले जाणार नाही असे बंधन नॅशनल बुक ट्रस्टने स्वतःवर घातले पाहिजे.

'नई तालीम संघा 'च्या वतीने १७ डिसेंबर १९७७ रोजी दिल्ली येथे देशातील शिक्षणतज्ज्ञांच्या परिषदेचे उद्घाटन करताना पंतप्रधान मोरारजी देसाई यांनी काढलेले उद्गार नॅशनल बुक ट्रस्टच्या संदर्भात अत्यंत महत्त्वाचे आहेत. पंतप्रधान म्हणतात, 'We have shed our physical slavery to the British, but mentally we are still slaves of English. Indians have the best brains in the world, but the number of experts produced are limited.' नॅशनल बुक ट्रस्टच्या गेल्या २१ वर्षांच्या कारभारातील मुख्य दोषाचे दिग्दर्शनच पंतप्रधानांच्या या उद्गारामध्ये आढळून येते.

माझ्या माहितीप्रमाणे बुक ट्रस्टमध्ये एखादा नवीन ग्रंथ तयार करताना प्रथम तो इंग्रजी भाषेत तयार करण्यात येतो व नंतर त्याचे भाषांतर देशी भाषेत करण्यात येते! इंग्रजी भाषेच्या अशा तऱ्हेच्या वैचारिक गुलामगिरीच्या कोणत्याही खाणाखुणा यापुढील दशकात दिसणार नाहीत असे धोरण बुक ट्रस्टने आखले पाहिजे.

बुक ट्रस्टतर्फे काढण्यात आलेल्या मराठी पुस्तकांपैकी भारत देश आणि लोक, नेहरू बाल-पुस्तकालय या विभागातील पुस्तके चांगली आहेत, त्यांची निर्मितीही वरच्या दर्जाची आहे. तथापि खाजगी क्षेत्रात जे होऊ शकणार नाही किंवा अपवादानेच निर्माण होऊ शकेल अशी फारच थोडी पुस्तके बुक ट्रस्टने प्रकाशित केलेल्या १४० पुस्तकांच्या यादीत आहेत असे म्हणणे भाग आहे. मराठी ग्रंथप्रकाशन-व्यवसायाच्या प्रगतीच्या सीमारेषा भेदून पार करणारी इतकी थोडी पुस्तके नॅशनल बुक ट्रस्टच्या यादीत असावीत यातच ट्रस्टच्या गेल्या २१ वर्षांच्या कारभाराचे अपयश साठविलेले आहे असे मला वाटते. पुढील दशकात ट्रस्टने अशा तऱ्हेने आपल्या धोरणाची आखणी केली पाहिजे की हे अपयश धुऊन निघेल.

नॅशनल बुक ट्रस्ट, साहित्य अॅकॅडमी अगर साहित्य संस्कृती मंडळ या संस्थांच्या आर्थिक व्यवहाराचे स्पष्ट चित्र सर्वसामान्य नागरिकांना कधीच पाहण्यास मिळत नाही. १४० पुस्तके काढण्यासाठी किती रक्कम खर्च झाली, एकूण उत्पादनखर्च किती, किती लेखकांना मानधन दिले, कसे दिले, पुस्तकविक्री किती झाली, अनुत्पादक वरकड खर्च ( overheads ) किती इ. महत्त्वाचे तपशील सहजासहजी उपलब्ध होत नाहीत. त्यामुळे या संस्थांच्या यशापयशाचे मोजमाप करू शकणारे एक परिमाणच हाती लागत नाही. फायदा झाला तर हा व्यवहार चांगला, तोटा झाला तर वाईट, अशी विचारधारा नसतानाही मला असे वाटते की, सार्वजनिक क्षेत्रातील आर्थिक परिस्थितीचे तपशिलातील दर्शन हे भयावह आहे. नॅशनल बुक ट्रस्टचा व्यवस्थापकीय खर्च ६७ लाख रुपये असून पुस्तकविक्री फक्त २८ लाख रुपयांची आहे अशी आमची ऐकीव माहिती आहे. म्हणूनच आर्थिक व्यवहाराची अत्यंत तपशीलवार माहिती प्रतिवर्षी आवर्जून सामान्य माणसापर्यंत पोचविण्याचा पायंडा पुढील दशकात घातला गेला पाहिजे.

या संदर्भातच प्रकाशित झालेल्या ग्रंथांच्या खपाचा प्रश्न निर्माण होतो. उच्च ध्येयाने प्रेरित होऊन सार्वजनिक क्षेत्रात ग्रंथांची निर्मिती सुरू होते. कालांतराने लक्षात येऊ लागते की, प्रकाशित ग्रंथांची वाचकाशी गाठभेट होणे कठीण होत चालले आहे. सरकारी यंत्रणेत त्या प्रश्नाचा खोलवर जाऊन विचार करण्यासाठी सवड काढण्याची कोणाला निकड वाटेनाशी होते; आणि साठलेल्या पुस्तकांचा विचार त्या पुस्तकांनी व्यापलेल्या लांबी-रुंदीच्या मोजमापाने सुरू होतो. अहवाल तयार होतात आणि फाइलीत असा शेरा सही केला जातो की, विशिष्ट सालाच्या अगोदरची सर्व पुस्तके रद्दीत अगर लगदा करण्यासाठी काढून टाकण्यात यावीत. पुस्तकांची अशी विल्हेवाट नॅशनल बुक ट्रस्ट व साहित्य अॅकॅडमीने लावली असल्याचे वृत्त मध्यंतरी वृत्तपत्रात प्रसिद्ध झाले होते. असे जर घडले असेल तर ती सर्व जाणत्यांना विषण्ण करणारी घटना आहे. यापुढील दशकात असा प्रसंग येणार नाही याची काळजी घेणे आवश्यक आहे, असे मला वाटते.

## कोणताही ठसा नाही

नॅशनल बुक ट्रस्ट व साहित्य अॅकॅडमीच्या बाबतीतच हा प्रकार घडला आहे असे नाही. मुंबई राज्यातील सरकारी प्रकाशन खात्यातही हेच घडले. न खपलेल्या पुस्तकांचे क्षेत्रफळ वाढू लागताच गॅझेटिअरचे अंक व पेशवे दप्तर हे लगदा करून टाकण्याचा निर्णय घेण्यात आला. पुस्तके जितकी जुनी तितकी त्याज्य एवढेच ज्ञान प्रकाशनाचे सार्वजनिक क्षेत्र सांभाळणाऱ्या सरकारी अधिकाऱ्यांना होते. जुनी पुस्तके दुर्मिळही असू शकतात हा नियम त्यांना नामंजूर असावा. लगद्याची शिक्षा ठोठावण्यात आलेले पेशवे दप्तर भारतीय इतिहास संशोधन मंडळात त्या वेळी आणण्यात आले. मराठी सारस्वताचे नशीब बलवत्तर म्हणूनच नंतर कित्येक वर्षे त्याची तेथे विक्री होत राहिली. हिंदुस्थानबाहेरील देशांत त्याच्या प्रती विकण्यात आल्या.

स्वस्त किमतीतील उत्तमोत्तम पुस्तकांची निर्मिती व त्यांचा खप याचे त्रैराशिक कधीही व्यस्त असता कामा नये. तसे होत असेल तर कोठे तरी चुकते आहे ही खूणगाठ मनाशी पक्की बाळगून त्याच्या कारणांचा शोध घेण्याची प्रवृत्ती सार्वजनिक क्षेत्रात निर्माण झाली नाही तर सामान्य जनतेत वाचनाची गोडी उत्पन्न करण्याचा मूळ हेतूच सफल होऊ शकणार नाही. मराठी प्रकाशनव्यवसायावर कोणताही परिणाम घडविण्याइतकी कामगिरी नॅशनल बुक ट्रस्ट अगर साहित्य अॅकॅडमी यांच्याकडून घडू शकलेली नाही हे कोणीही नाकबूल करणार नाही.

वितरणाबद्दल कमालीची अनास्था हा सार्वजनिक क्षेत्रातील आढळून येणारा नेहमीचा दोष आहे. पुस्तकाच्या जाहिराती परिणामकारक माध्यमातून देण्यात येत नाहीत, पुस्तक-विक्रेत्यांकडे पुस्तके विक्रीसाठी नीटपणे ठेवण्यात येत नाहीत, त्यांच्या कमिशनबद्दल योग्य धोरण घेतले जात नाही, पुस्तक-विक्रेत्यांशी पत्रव्यवहार त्यांच्या मातृभाषेतून अगर हिंदीतून केला जात नाही तर इंग्रजीतून करण्यात

येतो. पुस्तके छपून प्रकाशित झाली की आपले काम संपले अशी चुकीची समजूत काढून टाकून पुस्तके छापल्यानंतर पुढील महत्त्वाच्या कामाला सुरुवात होते हे ध्यानात आले तरच या क्षेत्रात होणारा अवाढव्य खर्च सरकारणी लागू शकेल. टी. व्ही., रेडिओ, डॉक्युमेंटरीज ह्यासारख्या सरकारी साधनांचा, पुस्तकांचा प्रचार करण्यासाठी, ती खपविण्यासाठी करण्याचा विचार नॅशनल बुक ट्रस्टसारख्या संस्थांनी आवर्जून केला पाहिजे. 'चिमणराव' हे सदर पुणे मुंबई दूरचित्र-वाणीवर सुरू झाले आणि चिं. वि. जोशी यांच्या सर्व जुन्या पुस्तकांच्या विक्रीला चालना मिळाली हे याबाबतीतले अगदी अलीकडचे उदाहरण या संदर्भात ध्यानात ठेवण्यासारखे आहे.

## ट्रस्टचे उल्लेखनीय कार्य

पुस्तकांचा प्रसार व खप ही सार्वजनिक क्षेत्रातील ग्रंथप्रकाशनाच्या व्यवसायातील मुख्य प्रक्रिया आहे. या दृष्टीने राजा राममोहन रॉय ट्रस्टने केलेले कार्य उल्लेखनीय आहे. सार्वजनिक क्षेत्राचा परिणाम खाजगी ग्रंथप्रकाशनावर घडत असल्याचे दृश्य प्रथमतःच या ट्रस्टच्या कामामुळे पाहावयास मिळाले. राजा राममोहन रॉय यांच्या द्विशताब्दी-महोत्सवानिमित्ताने या ट्रस्टची १९७२ साली केंद्र सरकारने स्थापना केली. ग्रंथ-प्रकाशन हे या सार्वजनिक क्षेत्राचे कार्य नाही. सार्वजनिक ग्रंथालयांचा ग्रंथसंग्रह समृद्ध करणे, दुर्मिळ होत चाललेले ग्रंथ जतन करण्यासाठी सहाय्य करणे व ग्रामीण भागात फिरती वाचनालये काढली तर त्याला सहाय्य करणे हे या सार्वजनिक क्षेत्राचे मुख्य हेतू आहेत. केंद्र सरकार व राज्य सरकार यांच्या समान भागीदारीतून या ट्रस्टतर्फे १९७३ ते १९७७ या ४ वर्षांत ३२ लाख रुपये किंमतीची पुस्तके खाजगी क्षेत्रातून विकत घेण्यात आली.

पुस्तके विकत घेतल्यामुळे खाजगी ग्रंथ-प्रकाशनाच्या व्यवसायास निश्चित सहाय्य झाले आहे; परंतु ही योजना येथेच थांबली नाही. विकत घेतलेली ही पुस्तके २६ जिल्हा ग्रंथालये, १९५ तालुका ग्रंथालये व ४८७ ग्रामीण ग्रंथालये यांच्याकडे प्रत्यक्ष पोहोचती करण्याचे कार्य महाराष्ट्रात या ट्रस्टतर्फे करण्यात आलेले आहे. सामान्य जनतेत पुस्तकांचा प्रसार करून वाचनाची गोडी निर्माण करण्याचे सार्वजनिक क्षेत्रातील हे पहिलेच उदाहरण म्हणता येईल.

जिल्हा, तालुका, ग्रामीण स्तरावरील ७०० हून अधिक ग्रंथालयांना ट्रस्टतर्फे विनामूल्य पुस्तके दिल्यानंतर त्या ग्रंथालयांना जे अनुदान मिळते त्याच्या २५ टक्के रक्कमही या यादीतील पुस्तके खरेदी करण्यासाठी वापरण्याचे बंधन ग्रंथालयांवर घालण्यात आले आहे.

सार्वजनिक क्षेत्रातील ग्रंथप्रसाराच्या या माध्यमाशी नॅशनल बुक ट्रस्ट व साहित्य अॅकॅडमीने सांगड घालणे जरूर होते व आजही आहे. दुर्दैवाने या प्रयत्नांना योग्य तो प्रतिसाद मिळाला नाही. ग्रंथ-प्रसाराच्या परिणामकारक यंत्रणेशिवाय ग्रंथ-प्रकाशनाचा व्यवहार यशस्वी होणार नाही असे मला वाटते.

एकाच व्यवसायातील दोन सार्वजनिक क्षेत्रांतील खाती म्हणजे त्यांच्यात विळ्या-भोपळ्याचे सख्य असावयाचे हा संकेतच ठरावा असे दिसते. राज्य सरकारच्या वतीने महाराष्ट्रात प्रकाशन विभाग ४०० ग्रंथालयांना ग्रंथांच्या स्वरूपात अनुदान देत असते; परंतु या ग्रंथांच्या यादीत साहित्य संस्कृती मंडळाच्या उत्तमोत्तम ग्रंथांचा समावेश करण्यात येत नाही.

ग्रंथ-प्रकाशनाच्या व्यवसायात गुंतलेल्या सार्वजनिक क्षेत्रातील सर्व संस्थांच्या कारभाराचे एकसूत्रीकरण करणे हे अत्यंत निकडीचे झाले आहे.

महाराष्ट्र राज्यात सार्वजनिक क्षेत्रात साहित्य संस्कृती मंडळाने १९६० पासून १७ वर्षांच्या काळात १३० ग्रंथ स्वतः प्रकाशित केले व ६०० पेक्षा अधिक ग्रंथांच्या प्रकाशनार्थ सहाय्य केले आहे. विश्वकोशाची निर्मिती ही याच सार्वजनिक क्षेत्रात झालेली कामगिरी आहे.

साहित्य संस्कृती मंडळाच्या कार्याचे तपशिलात विवेचन करून गुण-दोषांची चर्चा करण्याइतका आज वेळ नाही. तथापि इथेही प्रकर्षाने जाणवते ते हे की, या संस्थांचा आर्थिक व्यवहार हा सामान्य जनांना समजू शकत नाही.

साहित्य संस्कृती मंडळाच्या पुस्तकांचा खप किती होतो याचीही आकडेवारी वेळोवेळी सुलभपणे उपलब्ध होत नाही.

'विश्वकोषा'चे आज ७ खंड छापून तयार आहेत. तरीही साहित्य संस्कृती मंडळाने अद्याप त्याची विक्री का सुरू केलेली नाही, लक्षावधी रुपयांचे भांडवल पडून का राहिले आहे हे सामान्य जनांस कळू शकत नाही.

स्वतः पुस्तके प्रकाशित करण्यापेक्षा ग्रंथप्रकाशनासाठी अनुदान देण्यावर साहित्य संस्कृती मंडळाने जास्त भर देण्याचे सध्याचेच धोरण पुढे चालवावे. पुस्तकांच्या किंमतीवर बंधने न घालता, प्रकाशकांची भागीदारी दृढ करण्यासाठी, दिलेले अनुदान पुस्तकाची आवृत्ती संपली की परत घेण्याची पद्धत सुरू करण्याचा विचार करावा. स्वतःच्या मर्यादांचे उल्लंघन करण्याचा मोह या संघटनेने टाळला पाहिजे. उत्तम पुस्तके प्रकाशित करण्याच्या योजना स्वतः कार्यान्वित करणे हा मंडळाच्या उद्देशाचा अर्थ स्वतःचा छापखाना घालणे नव्हे. पुस्तके वेळेवर छापून मिळत नाहीत म्हणून छापखाना काढल्यानंतर छापखान्यासाठी टाइप वेळेवर मिळत नाही म्हणून टाइप फौंड्री काढण्याची योजनाही आपल्या उद्देशात बसविण्याचा प्रयत्न होणारच नाही असे नाही. हे मोह सार्वजनिक क्षेत्राने टाळावेत असे मला वाटते. तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांच्यासारख्या विद्वानांचा वेळ, बुद्धी व श्रम ही अशा तऱ्हेच्या व्यवस्थापकीय गोष्टीत खर्च होणे हे केव्हाही हितावह नाही.

इंग्रजी भाषेच्या वैचारिक गुलामगिरीतून साहित्य संस्कृती मंडळाचीही सुटका झालेली नाही. बोली भाषांचा अभ्यास करून प्रकाशित वाङ्मय खेडोपाडी नेण्याचा प्रयत्न करण्यासाठी कारवारी, कोकणी, कुडाळी, महाडची कुणबी, ठाण्याची वारली, कासारगोडची मराठी, गोव्याची गावडी अशी ९ पुस्तके चक्क इंग्रजीत प्रसिद्ध करण्यासाठी भरघोस अनुदान साहित्य संस्कृती मंडळाने दिले आहे. पंडिता रमाबाईंवर इंग्रजी ग्रंथ प्रकाशित करण्याचा मंडळाचा मानस आहे.

१९६७ साली पाठ्य-पुस्तक मंडळाची स्थापना झाली. पाठ्य-पुस्तकांचे राष्ट्रीयीकरण करण्यात आले. महाराष्ट्रातील प्रकाशन-व्यवसायास त्यामुळे जबर तडाखा बसला आहे. बँकांच्या राष्ट्रीयीकरणासारखी पाठ्यपुस्तकांच्या धंद्याचे राष्ट्रीयीकरण ही अर्थ-

व्यवस्थेची अनिवार्य गरज नव्हती. हा व्यवसाय संपूर्णपणे सरकारी नियंत्रणाखाली होता. एखाद्या व्यवसायात सुधारणा घडवून आणणे म्हणजे त्याचे राष्ट्रीयीकरण करणे नव्हे. तथापि ते झाले आहे. त्याच्या गुणावगुणांची चर्चा करण्याचे हे स्थळ नव्हे.

पाठ्य-पुस्तकांच्या राष्ट्रीयीकरणाने घडलेल्या अनेक अनिष्ट घटनांपैकी एकाच घटनेचा मला उल्लेख करावयाचा आहे. १९५४ पासून १९६७ पर्यंतच्या या काळात पाठ्य-पुस्तके लिहिणारी मराठी लेखकांची एक नवी पिढी महाराष्ट्रात निर्माण झाली होती. न समजणाऱ्या शब्दजंजाळाच्या मोहातून लेखकांची ही पिढी मुक्त होती. सोपे, समजणारे, मराठी लिहू शकणारी ही लेखकांची पिढी या सार्वजनिक क्षेत्राने पूर्णतः गारद केली. दरवर्षी ४ कोटी रुपयांची पुस्तके आम्ही विकतो असे दिमाखाने ज्या वेळी ही संघटना सांगत असते त्या वेळी १५ टक्क्यांप्रमाणे रॉयल्टीच्या ६० लाख रुपयांची मराठी लेखकांची लुबाडणूक या संघटनेने केली आहे असे मला वाटते. या देशातील लक्षावधी जनतेला त्यांना समजणाऱ्या सोप्या भाषेत लिहिलेल्या पुस्तकांची गरज आहे. त्यासाठी ज्या मराठी लेखकांचा उपयोग झाला असता ती लेखकांची पिढीच पाठ्य-पुस्तक मंडळाने निस्त्राण बनविली आहे. समाजप्रबोधनाच्या कार्याची, आपल्या सहजासहजी लक्षात न येणारी भयावह पीछेहाट या सार्वजनिक क्षेत्राने केलेली आहे.

विद्यापीठ ग्रंथनिर्मिती मंडळ, ज्ञानपीठ, सरकारी प्रकाशन विभाग या संस्थांबद्दल वेळेअभावी काही न बोलता या विषयाच्या दोन मूलभूत प्रश्नांचा ऊहापोह मला करावासा वाटतो.

सध्या चालू असलेले ग्रंथ-प्रकाशनाचे कार्य हे सार्वजनिक क्षेत्राने करावे काय हा पहिला प्रश्न. या पुढील दहा वर्षांत नॅशनल बुक ट्रस्टने आपले उद्दिष्ट साध्य करण्यासाठी कोणते कार्य करावे हा दुसरा प्रश्न.

स्वातंत्र्योत्तर ३० वर्षांच्या कालखंडात सार्वजनिक क्षेत्राने ग्रंथ-प्रकाशनाच्या व्यवसायात पदार्पण करून स्वतःचा कोणताच ठसा उमटविलेला नाही. त्या क्षेत्राने काही उत्तमोत्तम ग्रंथांची भर मराठी भाषेत घातली आहे. तथापि त्यासाठी समाजाचा खर्च झालेला अमाप पैसा व तयार झालेला उत्तम ग्रंथांचा केविलवाणा खप या गोष्टींचा विचार केला तर जमेपेक्षा खर्चाचीच बाजू अधिक आहे.

## प्रकाशन : एक स्वतंत्र निर्मिती

लेखन ही जशी स्वतंत्र निर्मिती आहे तशी प्रकाशन हीही एक निर्मिती आहे हा मूलभूत विचार सार्वजनिक क्षेत्राच्या ध्यानातच आलेला नाही. थोडेसे कर्ज, चार-दोन लेखक व एखादा छापखाना हाती आला की प्रकाशक निर्माण होत नाही किंवा ८००-३०-११०० EB ४०–१५०० या वेतनश्रेणीतील ७/८ अधिकारी नेमूनही प्रकाशक तयार होत नाही असे आतापर्यंतच्या अनुभवाने सिद्ध झाले आहे. तसे असते तर हरिभाऊ मोटे, रा. ज. देशमुख, अनंतराव कुलकर्णी, श्री. पु. भागवत, रामदास भटकळ, स. कृ. पाध्ये, केशवराव कोठावळे इत्यादी मंडळी आज सचिवालयात काम करताना आढळली असती. प्रकाशन ही एक निर्मिती आहे. म्हणून सार्वजनिक क्षेत्राने ग्रंथ-निर्मितीच्या क्षेत्रात प्रवेश करू नये असे मला वाटते. कथा, कादंबऱ्या, नाटके, वैचारिक ग्रंथ लिहिण्यासाठी सार्वजनिक क्षेत्राने संस्था उभारल्या तर ते जसे चुकीचे ठरेल तसेच प्रकाशनाचे कार्य करीत राहणे हे चुकीचे होईल असे मला वाटते.

यत्या १० वर्षांत नॅशनल बुक ट्रस्टने आपल्या कार्याची आखणी करीत असताना आज ज्या तऱ्हेचे प्रकाशन ते करीत आहे त्याचा विस्तार करण्याची कोणतीही योजना आखू नये.

उत्तमोत्तम ग्रंथांच्या निर्मितीसाठी खाजगी प्रकाशनाच्या क्षेत्रातील सर्व कौशल्याचा उपयोग करावा. त्यांच्या सहाय्याने पुस्तकांची आखणी बुक ट्रस्टने करावी व ग्रंथनिर्मितीचे कार्य खाजगी क्षेत्राकडे सुपूर्त करावे.

दुर्मिळ ग्रंथांच्या प्रकाशनासाठी सध्याच्या अनुदानपद्धतीत वाढ व बदल करण्याची आवश्यकता आहे. छापलेल्या पुस्तकांचा खप खाजगी क्षेत्रातील प्रकाशक करतील अशा तऱ्हेने सध्याच्या अनुदानपद्धतीत सुधारणा करावी.

जे जुने दुर्मिळ ग्रंथ उपलब्ध नसतील व ज्यांच्या नवीन आवृत्त्या खाजगी क्षेत्रात निघू शकत नसतील त्याच ठिकाणी सार्वजनिक क्षेत्राने अशा ग्रंथांचे स्वतः प्रकाशन करावे. ही मर्यादा स्वतःवर घालणे आवश्यक आहे. कारण नॅशनल बुक ट्रस्टसारख्या सार्वजनिक क्षेत्रावर यापेक्षा फार मोठ्या व महत्त्वाच्या कार्याची जबाबदारी येऊन पडली आहे असे मला वाटते.

## काळाची गरज

या देशातील १४ वर्षांपर्यंतच्या प्रत्येकाला सक्तीचे व मोफत शिक्षण देण्याचे मार्गदर्शक तत्त्व घटनेने मान्य केले आहे. गेल्या ३० वर्षांत ७ वीपर्यंतचे शिक्षण घेतलेल्या शिक्षितांची संख्या प्रचंड प्रमाणावर वाढली आहे. १५ ते २५ या वयाचे सहा कोटी व २६ ते ४५ या वयाचे दहा कोटी लोक अद्याप अशिक्षित आहेत. त्याहूनही महत्त्वाची समस्या ७ वीपर्यंत शिक्षण घेऊन समाजजीवनात पदार्पण केलेल्या प्रचंड समुदायाची साक्षरता टिकविण्याची आहे. ह्या समाजाला वाचता येईल, समजू शकेल अशा वाङ्मयाची आज या देशाला नितांत गरज आहे. हे वाङ्मय अक्षरशः प्रचंड प्रमाणावर निर्माण होण्याची आवश्यकता आहे. सार्वजनिक क्षेत्रात प्रकाशनव्यवसाय करणाऱ्यांच्या ध्यानात काळाची ही गरज आली नाही याचे कारण ही स्पंदने त्यांच्यापर्यंत पोचलेलीच नव्हती. सार्वजनिक क्षेत्रात प्रकाशनाचे जे कार्य आज चालू आहे ते समाजाच्या फक्त पाच-सहा टक्के लोकांना उपयोगी पडणारे आहे. अग्रक्रमात त्याची जागा बरीच खाली आहे. गरज आहे ती खेडोपाडी प्रचंड प्रमाणावर पसरलेल्या साक्षरांची साक्षरता टिकविण्याची. आज २१ वर्षांनंतर नॅशनल बुक ट्रस्टला अशा तऱ्हेची जाणीव आली हे मी अत्यंत महत्त्वाचे मानतो. बुक ट्रस्टचे अध्यक्ष श्री. डायस यांनी आपले उद्घाटनाचे जे भाषण केले आहे त्यात असे म्हटले आहे :

' In the wake of projected expansion of educational facilities particularly in rural areas, we anticipate that there will be much urgency in meeting the book need

of the people of all ages at different levels.'

नॅशनल बुक ट्रस्टच्या उद्देशातच सामान्य जनतेच्या ठिकाणी वाचनाची गोडी उत्पन्न करण्याचा समावेश आहे व वाचनाची गरज भागविण्याचा हा उद्देश अमलात आणला जात नाही एवढीच खरी अडचण आहे. त्या दिशेने दहाव्या पंचवार्षिक योजनेच्या काळात भरीव प्रगती केली पाहिजे.

सध्या चालू असलेले ग्रंथ-प्रकाशनाचे कार्य खाजगी क्षेत्राकडे सोपवून नॅशनल बुक ट्रस्टने येत्या १० वर्षांत वरील कार्यावर आपले सर्व लक्ष केंद्रित करण्याची आज गरज आहे. त्यासाठी ट्रस्टने आपल्या वैचारिक बैठकीत आमूलाग्र परिवर्तन केले पाहिजे. दिल्ली, हैदराबाद, कलकत्ता, मुंबई येथे विक्रीकेंद्रे उभारणे ही आजची गरज नाही. हा व्यय तात्काळ थांबविला पाहिजे. नॅशनल बुक ट्रस्टने असंख्य केंद्रे उभारली पाहिजेत; परंतु ती बार्शी, पंढरपूर, बीड, परभणी यांसारख्या ठिकाणी. प्रादेशिक कचेऱ्यासुद्धा पुण्या-मुंबईत न ठेवता एखाद्या तालुक्याच्या ठिकाणी सुरू केल्या पाहिजेत.

सोपे लिखाण लिहू शकतील, समजणारे लिखाण लिहू शकतील अशा लेखकांची पिढी मधल्या काळात लुप्त झाली. त्यांना पुन्हा या प्रचंड कार्यासाठी जमविले पाहिजे, त्यांच्याकडून पुस्तके लिहून घेतली पाहिजेत, खासगी क्षेत्रातील अनुभवाचा याही बाबतीत उपयोग करून घेतला पाहिजे. तयार होणारी पुस्तके समाजाच्या या थरापर्यंत नेण्याचे भगीरथ प्रयत्न केले पाहिजेत. नॅशनल बुक ट्रस्टच्या सर्व विभागांतील कार्यात आमूलाग्र परिवर्तन घडून आले पाहिजे. पुढील दशक हे या दृष्टीने अत्यंत महत्त्वाचे आहे.

हे कार्य कसे करता येईल असा ध्यास लागला तरच त्यात यश मिळण्याची शक्यता आहे. स्वातंत्र्योत्तर काळात भाकरा-नानगल, हिराकूड, नागार्जुनसागर, कोयना येथे प्रचंड धरणे बांधल्यानंतर त्यांना भारताची आधुनिक तीर्थक्षेत्रे म्हणून संबोधण्यात येऊ लागले. नॅशनल बुक ट्रस्टसारख्या सार्वजनिक क्षेत्रातील संघटनांना 'आधुनिक संत' म्हणणे जास्त उचित होईल. जुन्या संतांना लोकोद्धाराची अत्यंत तळमळ होती. आपले अनुभव आणि आपले विचार हे समाजाच्या सर्व स्तरांपर्यंत पोचावेत असा त्यांचा आग्रह होता. या आग्रहापोटी त्यांनी लोकमानसावर प्रभाव पाडणाऱ्या लोकप्रचलित आणि लोकप्रिय अशा माध्यमांचा निरीक्षणपूर्वक अंगीकार केला आणि त्या माध्यमातून आपला संदेश प्रवाहित करण्याचा उपक्रम सतत चालू ठेवला. त्यामुळे प्रारंभापासूनच मनोमिलाफ घडून आला. नॅशनल बुक ट्रस्टकडून पुढील १० वर्षांत नेमक्या या कार्याची गरज आहे. भीमसेन जोशी व कुमार गंधर्व यांचा मी चहाता आहे. त्यांची क्षमा मागून मला असे म्हणावेसे वाटते की, त्यांच्या मैफिलींची आज अग्रक्रमाने आवश्यकता नाही. एकतारीवर तुकारामाचे अभंग रात्रीच्या वेळी खेडेगावातील देवळात गाणाऱ्या गायकांना अग्रक्रम देण्याची आज गरज आहे. साक्षर झालेला खेडोपाडीचा नागरिक हा डोळ्यांसमोर ठेवून त्याच्यापर्यंत ज्ञान पोचविण्याचे नवे मार्ग सतत शोधीत राहाण्याची व त्याला योग्य अशा ग्रंथांची निर्मिती करण्याची महत्त्वाची जबाबदारी नॅशनल बुक ट्रस्टवर येऊन पडली आहे. ती पार पाडण्यासाठी ते स्वतःच्या विचारात व कृतीत आमूलाग्र परिवर्तन घडवून आणतील एवढी आशा या प्रसंगी व्यक्त करून शेवटी एकाच गोष्टीचा उल्लेख करतो व हे निवेदन संपवितो.

बुक ट्रस्टचे अध्यक्ष यांनी उद्घाटनाच्या आपल्या भाषणात एका छपराखाली चर्चा करण्यासाठी प्रकाशन-व्यवसायाशी संबंधित असणाऱ्या मंडळींची यादी दिली आहे. ते म्हणतात, 'occasions are rare, which, under one roof assemble all those concerned with the world of publishing such as writers, book-sellers, publishers, academicians, librarians, distributors etc. to discuss common problem.' संबंधितांच्या या यादीत printer – मुद्रक या एका नावाचा उल्लेख करण्याचे राहून गेले आहे असे दिसते.

तमोयुगाचा नाश करून पुनरुज्जीवनाचा जो कालखंड सुरू झाला त्याला मुद्रणाची कला हे महत्त्वाचे कारण होते याचे स्मरण करून देण्याची जरुरी आहे असे मला वाटत नाही. अध्यक्षांकडून मुद्रकाचे नाव केवळ अनवधानाने गाळले गेले आहे अशी माझी खात्री आहे. कारण नवीन अंगीकृत जबाबदाऱ्या पार पाडण्यासाठी पुढील १० वर्षांत मुद्रक हाही एक महत्त्वाचा घटक आहे याची जाण त्यांना निश्चित आहे.

माझे लांबलेले हे निवेदन आपण सहनशीलतेने ऐकून घेतले याबद्दल आपले आभार मानून आपली रजा घेतो.

□

---

## परिवर्तन

पृष्ठ ८ वरून

असा स्पष्टच आरोप राजनारायण यांनी नुकताच केला. उत्तरेकडील राज्यात जनसंघ आणि भालोद यांनी सहकार्य करून आपसात सत्तेचे वाटप केले. करणसिंगांच्या प्रश्नावर जनसंघाने सुरुवातीस मोरारजीभाईंना पाठिंबा दिला; पण आता पुन्हा जनसंघ व भालोद काँग्रेसवाल्यांच्या प्रभावाला शह देण्यासाठी एकत्र हालचाली करणार असे दिसत आहे.

या अंतर्गत संघर्षातून जनता पक्षाचे बळ वाढणार नाही. शिस्तबद्ध पक्षसंघटनेवर आणि कार्यक्रमाच्या परिणामकारक अंमलबजावणीवर लक्ष केंद्रित करायला हवे. गेल्या एका वर्षात या दृष्टीने झालेली प्रगती निराशाजनक आहे. राजस्थानातील अंत्योदयकार्यक्रम सोडला तर जनता सरकारांनी व पक्षराज्यकर्त्यांनी कार्यक्रमाच्या अंमलबजावणीकडे फारसे लक्ष दिलेले दिसत नाही. दारिद्र्यनिवारण, बेकारीनिवारण, जमीनसुधारणा, दलितांच्या प्रश्नांची सोडवणूक हे कार्यक्रम मार्गी लावून जनता सरकार खरोखर परिवर्तन घडवून आणीत आहे, असा प्रत्यय जनतेला यायला हवा. हुकूमशाहीच्या धोक्यास हे खरे परिणामकारक उत्तर आहे.

□

पुस्तके

# ' पुरुष '

## नवकथेच्या जडण-घडणीतील कथा

१९४५ ते ६० हा काळ मराठी साहित्यात मोठाच बदल घडवून आणणारा ठरला. कथावाङ्मयात जे बदल झाले–नवकथा अवतरू लागली त्याचे श्रेय गाडगीळ, मोकाशी, माडगूळकर, गोखले, भावे या लेखकांकडे जाते; पण याच काळात मधुकर त्र्यंबक देव हे आपल्या कथा 'सत्यकथे'मध्ये प्रसिद्ध करीत होते. 'सत्यकथे'मध्ये त्या त्या काळाचं साहित्यिक प्रतिबिंब पडत आहे. त्या दृष्टीने नवकथेच्या संदर्भात सत्यकथेचं महत्त्व वेगळं आहे.

मराठीतील लघुकथा ४५–६० च्या दरम्यान पुढे आली. आशय, अभिव्यक्ती, फॉर्म या सर्वांच्याच संदर्भात मराठीत निरनिराळे प्रयोग या काळात झाले.

या ठिकाणी एक मुद्दा असा उपस्थित होतो की, याही आधी हिंदी भाषेमध्ये १९३० साली प्रेमचंदांचो 'कफन' प्रसिद्ध झाली. अभिव्यक्ती, फॉर्म, भाषा या सर्वच संदर्भात ती कथा हिंदी साहित्यात अजूनही लक्षणीय ठरते. मग तिचे पडसाद नागपूरसारख्या हिंदी भाषिक गावीसुद्धा उमटू नयेत...आणि त्या दृष्टीने छोटासाही प्रयत्न झाल्याचे दिसून येत नाही, ही गोष्ट चिंतनीय आहे.

प्रत्येक भाषेतील वाङ्मय हे ज्याच्या त्याच्या स्वगतीवर पुढे जात असते; पण राष्ट्रीय स्तरावरील सांस्कृतिकतेची पडछाया मनुष्याच्या सर्वच अंगांवर पडत असते आणि तिचा अव्हेर जागरूकपणे किंवा अजागरूकपणे साहित्यात होणे ही घटना चिंतनीय आहे असे मला म्हणावयाचे आहे.

'पुरुष' हा श्री. मधुकर त्र्यंबक देव यांचा सतरा कथांचा संग्रह. यातील सर्वच कथांचा लेखनकाल हा १९४९ ते ६७ हा आहे. कथांचे विषय हे मध्यमवर्गीय मनुष्याला त्याच्या सर्वसाधारण विश्वात जे अनुभवाला येतं तेच आहेत. म्हणजेच या कथा एका विशिष्ट वर्गाचे प्रतिनिधित्व करतात. मध्यमवर्गीय तरुण, त्याचे भावविश्व, सांसारिक स्वप्ने, कारकून आणि औद्योगीकरणाला बळी पडलेल्या नोकरी करणाऱ्या स्त्रिया यांचे जे भावविश्व असते ते संयत अलिप्तपणाने पण हळुवारपणे मांडलेले आहे.

'चाहूल'मधील बापूंचं एकाकीपण, 'खेळ'-मधील रामभाऊंची मध्यमवर्गीय मनोवृत्ती, लक्ष्मीकांत जिंकला, पण या कथेतील रामभाऊ मात्र एका विशिष्ट मनोवृत्तीचे आहेत. या कथेची घडण ही त्याच कुतूहलप्रधानतेने झाली असल्याने कथा एका वेगळ्याच विश्वात घेऊन जाते.

'जागा' या कथेतील स्त्री–पुरुष संबंधांचे एक वेगळेच दर्शन हळुवारपणे श्री. देव करतात. औद्योगीकरणाने जीवनाची मूल्येच ढासळून गेली आहेत त्यात रोमँटिकपणा वगैरे गोष्टी केवळ फसव्या म्हणून येतात याचं चित्रण या कथेत दिसून येतं. नायक आणि नायिका दोघेही विवाहित आहेत, नायिकेचा पती नोकरीसाठी परगावी आहे, अशा वेळी 'जागे'च्या शोधात असलेले हे दोघे एकमेकांच्या जवळ येतात–फक्त भावनिक स्तरावर, नायिकेला तिच्या पतीपासूनच दिवस जातात; पण संशयाला जागा नको म्हणून ते मूल ती पाडून टाकते आणि इकडे परगावी असलेला तिचा पती एका विद्यार्थिनीच्या प्रेमात पडतो. प्रत्येकजण आपली 'सोय' पहातो हे सत्य या कथेत मांडण्याचा प्रयत्न श्री. देव समर्थपणे करतात.

आर्थिक ओढगस्तीने मध्यमवर्गीय कौटुंबिक ओलावा कसा सुकत चालला आहे याचं सार्थ शब्दचित्रण इथे 'पुरुष', 'आत आणि बाहेर' या कथांमधून दिसून येतं.

श्री. देव यांची लेखणी विलक्षण संवेदनाक्षम आहे. त्यांचं अनुभवविश्व हे मध्यमवर्गीय असले तरीही संवेदनाक्षम मन ते अनुभवही वाङ्मयीन पातळीवरून घेऊ शकते. प्रस्तावनेत डॉ. द. भि. कुलकर्णी लिहितात, 'म. त्र्यं. देवांच्या कथांवर गाडगीळ–भावे यांचा संमिश्र पगडा आहे हे म्हणणे सोपे आहे; 'सतरावे वर्ष' आणि 'वीस' यातील दृष्टिकोण, साम्य स्पष्टच आहे; पण साकल्याने पाहता नवकथेच्या काळात ज्या नव्या वाटा निर्माण होत होत्या त्यांचे हे अपुरे राहिलेले कामकाज आहे! या अर्थाने म. त्र्यं. देव हे भावे–गाडगीळ व जी. ए. – जातेगावकर यांच्यामधील दुवा होत.'

'पुरुष' या संग्रहातील बालकथा विशेष लक्ष्यवेधी आहेत. 'मांजा', 'लंगडी', 'शाळा', 'मीनाची चटणी' या बालमनाचे चित्रण करणाऱ्या कथा आहेत. बालांसाठी लिहिलेल्या या कथा नसून मानसशास्त्राच्या एका वेगळ्या भूमिकेतून केलेला तो आविष्कार आहे.

'लंगडी'मधील लग्नाची वरात पहाण्यासाठी आसुसलेली पण लंगड्या भिकाऱ्याची ओढगाडी पहावी लागणारी कमनशिबी लंगडी आहे. त्या 'लंगडी'च्या बालमनाचं चित्रण श्री. देव मानसशास्त्रीय पातळीवरून आविष्कृत करतात. त्यामुळे त्या कथेला एक वाङ्मयीन मूल्य प्राप्त झाले आहे. 'मांजा'-मधील शशीचे बालपणीचे स्वप्न, 'मीनाची चटणी'मधील बालमन आणि त्या मनाला सहन न होणारा, लहानपणीचा 'इगो' दुखावणारा अवसानघात यांचं चित्रण आहे.

या बालकथा हे एक बंडच होते. त्या काळातील कथांच्या संदर्भात या बालकथांचे महत्त्व वेगळेपणाने मान्य करायला हवे. 'प्रस्तावने'त लिहिल्याप्रमाणे, 'नव्या मानसशास्त्राने जे नवे आंतरवास्तव मराठी मनाला दाखविले त्याचा हा एक ललित आविष्कार होता. लघुकथा, बालमन, वास्तवता यासंबंधी ज्या सांकेतिक कल्पना रूढ झालेल्या होत्या त्याविरुद्ध हे कलात्मक बंड होते.'

'पुरुष'मधील कथांची वाङ्मयीन मूल्ये आजच्या वाङ्मयीन मूल्यांच्या निकषावर घासून पहाणे चुकीचे ठरेल.

काळ जसजसा बदलत जातो तसतसे त्याचे पडसाद साहित्यातूनही दिसून येतात. त्याबरोबरच साहित्यिक मूल्यांचे निष्कर्षही बदलले जातात.

एवढे असूनही एक गोष्ट मात्र अशी लक्षात येते की, ही कथा नवकथेच्या बाजूला थोडीशी झुकलेली आहे. पूर्णांशाने नवकथा अशी ही नाहीच. प्रतिमांचा वापर, वैचारिकता, भाषा यांच्या संदर्भात विचार केला असता या गोष्टी या कथासंग्रहाच्या बाबतीत लक्षात घ्याव्या लागतात. म्हणूनच या कथा 'वैचारिक कथां'कडे न झुकता आपलं अस्तित्व तेवढ्यापुरते का होईना टिकवून आहेत.

नवकथेच्या आंदोलनाला थोडासा हातभार लावणाऱ्या या कथा निश्चितच वाचनीय आहेत, फक्त त्याला आजची वाङ्मयीन मूल्ये लावून चालणार नाही.

—मुकुंद संगोराम

'पुरुष' (कथासंग्रह)
मधुकर त्र्यंबक देव
वसुधा प्रकाशन, नागपूर
मूल्य – १५ रुपये

कार्यकारिणीचे एक सदस्य करणसिंग यांनी अलीकडेच जाहीररित्या आम्ही घेतलेल्या निर्णयाचे समर्थन केले आहे. ही गोष्टही पुरेशी सूचक आहे.

प्रश्न : जनता पक्षाबरोबर चव्हाणांचे सूत आहे, असा जो आरोप इंदिराजी करतात त्याला आपल्या निर्णयाने पुष्टी मिळत नाही काय ?

उत्तर : कॉंग्रेस नेत्यांच्या संशयी वृत्तीचे मला आश्चर्य वाटते, त्यांचा या बाबतचा दृष्टिकोन मला समजू शकत नाही. पक्षीय राजकारणाबाहेर व्यक्तिगत संबंधही असतातच की ! इतरांचे कशाला, स्वत: इंदिराजी मोरारजीभाईंना दोन वेळा भेटल्या होत्या, हे विसरता येणार नाही.

केवळ एवढेच नाही तर बाबूजींशीही सूत जमवून त्यांना स्वत:च्या पक्षातर्फे पंतप्रधानपद देण्याची तयारी दाखविली, असे म्हणताच मुख्यमंत्री म्हणाले, 'इंदिराजी कोणतीही गोष्ट करू शकतात. यांनी काहीही केले तरी चालते अशी अवस्था असताना आम्हीच तेवढा बचावात्मक पवित्रा कशासाठी घ्यायचा ? इंदिराजींना एवढे घाबरण्याचे कारण काय ? त्यांना विरोध करणाऱ्या कोणाशीही दोस्ती करण्यास मी सिद्ध आहे.'

प्रश्न : आजवर महाराष्ट्रामध्ये स्थिर सरकार राज्य करीत असे; परंतु निवडणूक निकालानंतर अस्थिरता आली. एक सरकार कोसळून दुसरे सरकार आले, हा बदल झाला असला तरी आपले सरकार स्थिर राहील याची जनतेला खात्री वाटत नाही.

उत्तर : माझ्या सरकारच्या स्थिरतेबाबत चिंता करण्याचे कारण नाही. पहिल्या सरकारला केवळ १५३ सदस्यांचा पाठिंबा होता. त्यामुळे अगदी निसटते बहुमत त्यांच्या मागे होते. माझ्या सरकारला चांगला १८० आमदारांचा पाठिंबा आहे. जोपर्यंत आम्ही हाती घेतलेल्या कार्यक्रमाशी आणि जनकल्याण योजनांशी एकनिष्ठ आहोत तोपर्यंत आम्हाला काळजी करण्याचे कारण नाही. एक प्रगत आणि सुस्थिर राज्य म्हणून महाराष्ट्राची जी प्रतिमा आहे ती जोपासण्यात आम्ही यशस्वी ठरू असा विश्वास वाटतो.

प्रश्न : राष्ट्रीय स्वयंसेवक संघाबाबत तुमचे धोरण काय आहे ? या संघटनेचा जनता पक्षावर दबाव असल्याचे बोलले जाते.

उत्तर : संघाचा जन्म जरी महाराष्ट्रामध्ये झाला असला तरी संघ महाराष्ट्रामध्ये फारसे मूळ धरू शकला नाही. संघ ही एक ऐच्छिक संघटना असून जनता पक्षाबाहेर राहून ती काम करीत आहे. जनता पक्षामध्ये काही संघीय मंडळी आहेत. तथापि तशी काही माजी संघीय मंडळी कॉंग्रेस पक्षामध्येही होती. त्या बाबत विचार करण्याचे अथवा या संघटनेला फाजील महत्त्व देण्याचे कारण नाही.

प्रश्न : महाराष्ट्र जनता पक्षामध्ये संघवाल्यांचे प्राबल्य आहे असे आपल्याला वाटते का ?

उत्तर : नाही. मला तसे वाटत नाही आणि त्यांच्या दडपणाला मला आजवर तोंड द्यावे लागले नाही.

प्रश्न : जनता पक्षीय सहकाऱ्यांबाबत तुमचा काय अनुभव आहे ?

उत्तर : ठीक आहे. त्यांच्या बाबतीत मी समाधानी आहे. प्रारंभी मला असे वाटत होते की, काही आर्थिक व राजकीय प्रश्नांवरून मतभेद निर्माण होतील, वादविवाद होतील; परंतु आता अनुभवावरून असे लक्षात येते की, या विषयावरील महत्त्वाच्या प्रश्नांबाबत ते माझ्याशी सहमत आहेत. त्यांनाही निश्चित अंमलबजावणी होऊ शकणाऱ्या कार्यक्रमाच्या अंमलबजावणीची माझ्याइतकीच घाई आहे. जुन्या संयुक्त सरकारपेक्षा हे सरकार निश्चितपणे उजवे आहे, हा नवीन प्रयोग महाराष्ट्रामध्य यशस्वी झाला पाहिजे, अशी माझ्या सहकाऱ्यांची धारणा आहे. ('करंट' ५ ऑगस्ट, मुलाखतकार अमुल सैद). □

## □ जागतिक युवकमहोत्सव

ज्यांचा राजकारणाशी संबंध आहे आणि ज्यांचे धागेदोरे वरपर्यंत आहेत अशा काही भाग्यवान मंडळींखेरीज इतरांना जागतिक युवकमहोत्सव ही काय चीज आहे, हे फारसे माहीत असण्याचा संभव नाही. प्रामुख्याने डाव्या विचारसरणीच्या तरुण नेतृत्वाखाली हा महोत्सव साजरा होत असतो. या जागतिक युवकमहोत्सवमालिकेमधील अकरावा महोत्सव क्युबामध्ये सुरू झाला असून या महोत्सवात भाग घेण्यासाठी १३० भाग्यवान तरुण भारतीय राजकारणी सहभागी झाले आहेत. युवा जनताचे अध्यक्ष श्री. मायाकृष्णन यांच्याकडे भारतीय शिष्टमंडळाचे नेतृत्व आहे. या शिष्टमंडळामध्ये बहुतेक सर्व राजकीय पक्षाच्या युवा आघाड्यांना प्रथमच प्रतिनिधित्व देण्यात आले आहे. मेळाव्याची तयारी करण्यासाठी, म्हणजे प्रामुख्याने कोणाला पाठवायचे याची निवड करण्यासाठी जी समिती नेमण्यात आली होती त्या समितीचे अध्यक्ष चंद्रशेखर होते आणि अन्य सर्व प्रमुख पक्षांची बडी मंडळी समितीमध्ये समाविष्ट झालेली होती. आज संयोजकांमार्फत असे सांगितले जाते की, विविध पक्षांमधील ही वेचक तरुण मंडळी आपल्या पक्षाचे नेतृत्व करीत असली तरी सर्वजण क्युबामध्ये भारताचे प्रतिनिधित्व करीत असल्याने भारतामधील तरुणवर्ग भांडवलशाही व वसाहतवाद यांच्या विरोधात उभा असल्याचे चित्र दिसते. कारण समाविष्ट झालेल्या तरुणांच्या राजकीय पक्षांनी याबाबतची आपली धोरणे पूर्वीच घोषित केली आहेत. याउलट प्रामुख्याने कम्युनिस्टांच्या नेतृत्वाखाली भरत असलेल्या या महोत्सवासाठी भारतातर्फे जे खिचडीमंडळ पाठविण्यात येत आहे त्यामध्ये समाविष्ट झालेल्या तरुण नेत्यांमधील वैचारिक मतभेद तीव्रतेने पुढे येतील असे दिसते, असा अनेकांचा अंदाज आहे. या महोत्सवामध्ये जुन्या जनसंघीयांना फारसा रस नसेल असा प्रारंभी समज होता; पण त्या गटाचे एक नेते स्वामी सुब्रह्मण्यम् यांनी आपला कोटा पुरेपूर वसूल केला. आपली चार मंडळी विनाखर्चाने परदेशी पाठविता येत असली तर असली सुवर्णसंधी कोण दवडणार ?

जनसंघाच्या मंडळींना असल्या महोत्सवामध्ये रस नाही असे समजणारांनी जनसंघ जनतामध्ये आल्यापासून बदलला आहे, हे इतर वेळी मंत्राप्रमाणे जपले जाणारे सूत्र नेमके विसरलेले दिसते. असो. तात्पर्य काय, तर तमाम राष्ट्रीय आणि प्रमुख प्रादेशिक पक्षामधील तरुण शाखांचे प्रतिनिधित्व असलेले हे शिष्टमंडळ या आंतरराष्ट्रीय महोत्सवामध्ये सहभागी होऊन आता परतीच्या वाटेवर असेल.

या महोत्सवांना १९४५ साली प्रारंभ झाला. युद्धाचा भयानक परिणाम पाहिलेली तरुण मंडळी लंडनमध्ये जमा झाली आणि त्यांनी शांततेसाठी चळवळ करण्याचा आणि विशेषत: तरुणांना शांततेचे महत्त्व पटवून देण्याचा निर्णय घेतला. आंतरराष्ट्रीय सामंजस्य वाढावे म्हणून तरुण नेते व विद्यार्थी यांनी एक नवे व्यासपीठ उभारावे व दर दोन वर्षांनी एकत्र येऊन चर्चा करावी असे ठरले. १९४७ साली प्राग येथे पहिला आंतरराष्ट्रीय युवकमेळावा भरला होता. पुढे शीतयुद्धाला तोंड फुटले आणि या आंतरराष्ट्रीय युवकमेळाव्याला डावा तोंडावळा प्राप्त होऊन रशियाच्या पुढाकाराने भरविण्यात येत असलेला मेळावा असे स्वरूप प्राप्त झाले. या महोत्सवाच्या तयारीसाठी जी आंतरराष्ट्रीय समिती काम करीत असते तिची सारी यंत्रणा वर्ल्ड फेडरेशन ऑफ डेमॉक्रेटिक यूथ या सतत अस्तित्वात असलेल्या यंत्रणेमार्फत निर्माण करण्यात येते. या कामी इंटरनॅशनल युनियन ऑफ स्टुडंटस् (आय. यू. एस.) या संघटनेचे सहकार्य घेण्यात येते.

या महोत्सवामधील भारतीय सहभागाचा विचार केला तर असे दिसते की, १९७३ पर्यंत केवळ उजव्या कम्युनिस्टांच्या तरुण व विद्यार्थ्यांच्या संघटना या महोत्सवामध्ये सहभागी होत असत. आजही वर उल्लेखिलेल्या दोन संघटनांशी फक्त कम्युनिस्ट पक्षाच्याच संबंधित संघटना संलग्न आहेत. यापूर्वीच्या शिष्टमंडळामध्ये ज्यांचा प्रागतिक विचाराचे म्हणून उल्लेख केला जात असे अशा काही कॉंग्रेसनेत्यांचा समावेश केला जाई. १९७३ साली प्रियरंजनदास मुन्शी यांच्या नेतृत्वाखाली काम करणाऱ्या युवक कॉंग्रेसला अधिकृतरीत्या आमंत्रण देण्यात आले होते. ज्या आंतरराष्ट्रीय संघटनेमार्फत हा महोत्सव आयोजित करण्यात येतो त्या संघटनेने १९७६ साली डावे व उजवे कम्युनिस्ट आणि कॉंग्रेस यांच्या युवकसंघटनांकडे विचारणा केली होती. केवळ डाव्या विचारसरणीच्या लोकशाही (?) युवासंघटनांना आमंत्रित करावे असा क्यूबाचा आग्रह होता. त्या वेळी संजय गांधी यांची युवकसंघटना चांगली जोरात होती; परंतु त्यांनी कम्युनिस्टांबरोबर सहकार्य करण्यास नकार दिला. संजयजींचा असा दावा होता की, भारतीय युवकांचे प्रतिनिधित्व केवळ आपली संघटनाच करू शकते. या मतभेदामुळे त्या वेळी या महोत्सवाच्या तयारीसाठी जी समिती नेमण्यात आली होती तीमध्ये भारतीय प्रतिनिधीचा समावेश होऊ शकला नाही. नोव्हेंबर १९७६ मध्ये संजय गांधी यांच्या नेतृत्वाखाली आसाममध्ये जो मेळावा भरला होता त्यामध्ये १८ देशांच्या प्रतिनिधींनी सहभाग घेतला होता. त्या वेळीही क्यूबामध्ये भरणार असलेल्या महोत्सवाच्या तयारीसाठी नेमलेल्या समितीवर भारतीय प्रतिनिधी घेण्याबाबत चर्चा झाली; पण काही निष्पन्न झाले नाही. कारण आपल्या भूमिकेबाबत संजय गांधी अतिशय आग्रही होते. तथापि निवडणुकांनंतर चित्रच बदलले आणि आता भारतातर्फे जो १३० जणांचा सर्वपक्षीय ताफा पाठविण्यात आला त्यामध्ये इंदिरा कॉंग्रेसच्या युवाशाखेचे प्रमुख रामचंद्र राथही सहभागी झाले.

क्यूबामध्ये भारतीय शिष्टमंडळ कितपत प्रभाव पाडू शकेल याविषयी शंकाच आहे. निवड करण्याच्या वेळेपासूनच एकमेकांचे पाय ओढण्याचे राजकारण चालूच होते. त्याचे प्रतिबिंब आणि त्याच विषयावरून मनात सलत असलेला असंतोष क्यूबा मध्ये पहावयास मिळण्याची शक्यता जास्त आहे. अशा शिष्टमंडळाला जो एकजिनसीपणा लागतो तो अवाढव्य खर्च करून पाठविण्यात आलेल्या भारतीय शिष्टमंडळाला नाही. खेरीज १९७३ च्या बर्लिन येथील महोत्सवाच्या वेळचा भारतीय शिष्टमंडळाचा अनुभव काही फारसा सुखकारक नाही. त्या वेळी गेलेल्या शिष्टमंडळाचे नेतृत्व प्रियरंजनदास मुन्शी यांच्याकडे होते. उजवे कम्युनिस्ट आणि युवक कॉंग्रेसचे नेते यांनाच आमंत्रण असल्याने केवळ या संघटनांशी संबंधित असलेल्या व्यक्तींचीच निवड करण्यात आली होती. म्हणजे क्यूबामध्ये पाठविण्यात आलेल्या शिष्टमंडळापेक्षा या शिष्टमंडळाला जास्त एकजिनसीपणा होता आणि तरीही हे शिष्टमंडळ आपला ठसा तर उमटवू शकले नाहीच, उलट देशाची बदनामी व्हावी असे काही प्रकार घडले आणि त्याची सारवासारव करताना प्रियरंजन मुन्शी यांची चांगलीच तारांबळ उडाली. बर्लिनला विमान उतरल्यावर एका शहाण्याने हिटलर झिंदाबादचे नारे लगावले आणि स्वत:चे हसे करून घेतले.

या महोत्सवासाठी येणारी सारी शिष्टमंडळे पुरेशी तयारी करून आलेली असतात आणि महोत्सवाकडे पाहण्याचा त्यांचा दृष्टिकोन प्रामुख्याने गंभीर स्वरूपाचा असतो, तर भारतीय शिष्टमंडळापैकी बहुसंख्य मंडळी मौजमजा करण्यासाठीच आपण आलो आहोत, अशा समजुतीने वावरत असतात. या देशामधील सामान्य नागरिकांचे सोडा, अगदी तरुणांचे उदाहरण घेतले तरी किती जणांना असा महोत्सव होतो याची माहिती आहे, याचीही शंकाच आहे. याला अपवाद फक्त प. बंगाल, केरळ व आंध्र प्रदेश यांचा. कारण तेथे तरुणांची ही आंतरराष्ट्रीय चळवळ चांगलीच गंभीरपणे घेतली जाते आणि राजकारणाशी संबंधित असलेल्या अनेकांना या चळवळीची चांगलीच माहिती असते तथापि केवळ विशिष्ट राजकीय विचारांशी बांधिलकी

असलेल्या या महोत्सवामध्ये केवळ मौजमजा करण्याच्या उद्देशाने जर तरुण सहभागी होत असतील, तर भारताने आपले शिष्टमंडळ पाठविताना विचार केला पाहिजे आणि पुढील वेळी ते पाठवायचे ठरलेच, तर ते केवळ राजकारण्यांपुरते मर्यादित न ठेवता उमेदीचे तरुण कलाकार आणि आंतरराष्ट्रीय पातळीवर मान्यता पावलेले खेळाडू यांना संधी देऊन एक नवीन पायंडा पाडला पाहिजे. □

## असे ऐकिवात आहे की . . .

□□ जनता पक्षाच्या राष्ट्रीय कार्यकारिणीमध्ये चरणसिंग यांच्या- बद्दल चर्चा चालू असताना उत्तर प्रदेशामधील जनता पक्षाचे नेते आणि एके काळचे उत्तर प्रदेशचे सर्वेसर्वा चंद्रभानु गुप्ता यांनी चौधरी चरणसिंगांवर कठोर टीकास्त्र सोडले. हे करण्यामागे चौधरी साहेबांवरील राग तर होताच; पण खेरीज जमले तर पंतप्रधानांची मर्जी संपादन करता आली तर पहावे, असाही उद्देश होता. चौधरी- साहेबांवर त्यांनी जी कठोर टीका केली त्याला कडवटपणाची झाक होती. पुढे आपल्या भाषणात त्यांनी चौधरीसाहेबांवर व्यक्तिगत हल्ला चढवताच बिजू पटनाईक चटकन म्हणाले, 'हे पहा, या वैयक्तिक गोष्टींचा आता इथे काहीही संबंध नाही.' आपल्या भाषणावर मधेच भाष्य केल्याचे पाहून गुप्ताजी अस्वस्थ झाले. काहीसे संतापले आणि त्यांनी पटनाइकांना प्रश्न केला, 'तुम्हाला उत्तर प्रदेशाबद्दल काय माहिती आहे?' पटनाईक यांनी लगेच तत्परतेने उत्तर दिले की, 'बाकी काही गोष्टी मला माहिती नसल्या तरी एक गोष्ट माहीत आहे. की याच उत्तर प्रदेशामध्ये निवडणुकीत तुमची अनामत रक्कम जप्त झाली आहे. लोकांपासून तुम्ही किती दूर आहात हे सिद्ध करण्यासाठी आणखी काही वेगळ्या पुराव्याची आवश्यकता आहे काय?' हा असला हल्ला अपेक्षित नसल्याने चौधरीही काहीसे नरम आले आणि त्याच वेळी पंत प्रधानही त्यांच्या मदतीला धावले. ते बिजुबाबूंना उद्देशून म्हणाले, 'जसा चौधरीं- वरील वैयक्तिक टीकेचा येथे संदर्भ नाही, त्याचप्रमाणे गुप्ताजीं- वरील वैयक्तिक टीकेचाही येथे संदर्भ नाही.' या टीकाटिपणीनंतर गुप्ताजींनी भाषण आवरते घेतले.

□□ जनता पक्षांतर्गत संघर्षामध्ये मध्यस्थी करीत असलेले एक ज्येष्ठ नेते खासदार मधु लिमये हे पक्षाध्यक्षपदाची निवडणूक लढविण्याची शक्यता आहे. येत्या ऑक्टोबर-नोव्हेंबरमध्ये येऊ घातलेल्या या पक्षीय निवडणुकांना असाधारण महत्त्व आहे. आपल्या गटाचे वर्चस्व प्रस्थापित करण्याच्या दृष्टीने प्रयत्न झाले तर या निवडणुकांनंतर संघर्ष अधिक तीव्र होण्याची शक्यता आहे. याउलट जास्तीत जास्त मंडळींचा कल लक्षात घेऊन निवडणुका झाल्या व हेतुतः ज्येष्ठ नेत्यांनी एकमेकांना दुखविण्याचे टाळले तर पक्षीय संघर्षाची धार बोथट होईल. अर्थात असे होण्याची शक्यता आता तरी कमी दिसते. तथापि या निवडणुकीत उतरण्याचे श्री. लिमये यांनी ठरविलेच तर त्यांना भारतीय लोकदल, समाजवादी आणि जनसंघ यांचा पाठिंबा मिळण्याची शक्यता आहे.

□□ पुरुषोत्तम कपूर या तांत्रिक भविष्यवेत्याने असे भविष्य वर्तविले होते की, चरणसिंग भारताचे पंतप्रधान होतील. प्रत्यक्षात आज तरी चरणसिंग यांना तसेच त्यांचे पुरस्कर्ते श्री. राजनारायण यांना मंत्रि- मंडळामधून बाहेर पडावे लागले आहे. या भविष्यवेत्यावर हे दोघेही नेते रागावले आहेत. भविष्यकथनाबाबत चुका करण्याची या तांत्रिकाची परंपराच आहे. आणीबाणीच्या काळात आणि नंतर निवडणुका घोषित झाल्या त्या वेळी हे तांत्रिक-भविष्यवेत्ते पुरुषोत्तम कपूर इंदिराजींशी संपर्क ठेवून होते. १९७६ च्या निवडणुकांच्या वेळी इंदिरा गांधी आणि त्यांचा पक्ष विजयी होतील असे भाकित त्यांनी केले होते. प्रत्यक्षामध्ये नेमके उलटे घडले. चुका करण्याची आपली परंपरा राजकीय वर्तुळामध्ये वर्चस्व असलेल्या या तांत्रिकाने कायम ठेवली आहे.

□□ देशामध्ये असलेल्या विदेशी वार्ताहरांचा इंदिराजींनी आणीबाणी- पर्वामध्ये सर्वप्रथम बंदोबस्त केला. एका मातब्बर जर्मन साप्ताहिकाचे प्रतिनिधी श्री. एस्. पी. सिन्हा यांची मान्यता काढून घेण्यात आली. फोन तोडण्यात आला आणि माहिती आणि नभोवाणी मंत्रालयामध्ये दादागिरी करणाऱ्या एका अधिकाऱ्याने त्याला नोकरी सोड अथवा गंभीर परिणामास तयार रहा अशी धमकी दिली. सिन्हांनी या गोष्टीला नकार दिला. ज्या साप्ताहिकासाठी सिन्हा काम करीत होते त्या साप्ताहिकाने ही त्या वेळची परिस्थिती लक्षात घेऊन श्री. सिन्हा यांची नेपाळमध्ये बदली केली.पुढे नवीन सरकार आल्या- वर सिन्हा अर्थातच स्वदेशी परतले आणि याच सिन्हा यांनी आपली मुलाखत घ्यावी म्हणून इंदिराजींनी प्रयत्न सुरू केले. योग्य त्या मध्यस्था मार्फत श्री. सिन्हा यांच्यापर्यन्त निरोप पोचविण्यात आले.त्यांनी बाईंची मुलाखत घेतली. त्या मुलाखतीमध्ये त्यांनी म्हटले आहे की, ऐंशी मिनि- टांच्या या मुलाखतीमध्ये बाईंनी थापावर थापा मारल्या. अत्यंत सफाई- दारपणे त्या खोटे बोलल्या. पत्रकारांवर विशेषतः विदेशी वृत्तपत्रांचे प्रतिनिधित्व करणाऱ्या मंडळींवर अन्याय झाला हे त्या वेळी त्यांना समजू शकले नाही, असे त्यांनी सांगितले. संजयच्या बाबतीत विचा- रलेल्या प्रश्नांना उत्तरे देताना त्यांनी संजयचा बचाव करण्याचा प्रयत्न केला. त्याच्या मोटारकारखान्याबाबत सरकारने कोणतीही गोष्ट काय- द्याला सोडून केली नाही हेही त्यांनी पुन्हापुन्हा सांगितले.तथापि त्यांच्या या कथनाने सिन्हा प्रभावित झाले नाहीत. Der Spiegel या जर्मन साप्ताहिकाच्या ज्या अंकात ही मुलाखत प्रसिद्ध झाली आहे त्यामध्ये

मुलाखतकर्त्याने जे भाष्य केले आहे त्यावरून इंदिराजींबाबत पुन्हा फसगत करून घेण्यास तो तयार नाही असेच दिसून येते.

आपला निवडणुकीमध्ये पराभव का झाला या प्रश्नाला इंदिराजींनी तेच ठराविक उत्तर दिले आहे. त्या म्हणतात, आणीबाणीच्या बाबतीत वृत्तपत्रांनी जो खोटानाटा प्रचार केला तो त्रासदायक ठरला. तथापि या गोष्टी खोटचा होत्या असे लोकांच्या आता लक्षात येऊ लागले आहे. ही वस्तुस्थिती बाहेरील जगाने लक्षात घेतली पाहिजे असे त्या म्हणतात इतकेच नव्हे तर हे समजावून सांगण्यासाठी आपण काही मंडळींना पश्चिम जर्मनीचा दौरा करण्यास सांगू असेही त्या म्हणतात. तसे पूर्वी आणीबाणीच्या वेळी त्यांनी आणीबाणीचे समर्थन करण्यासाठी त्यांचा पाठपुरावा करणाऱ्या अनेक मंडळींना विदेशी पाठविलेच होते; पण तेव्हाची गोष्ट निराळी होती. सत्ता त्यांच्या हाती होती त्यामुळे खर्चाचा प्रश्न नव्हता. आता जर त्यांना कोणाला परदेशी पाठवायचे असले तर खर्च कोण करणार ? ◻

◻ ◻ महाराष्ट्रातले नवीन सरकार किती काळ सत्तेवर राहील हा सध्या ज्योतिषांमधील चर्चेचा विषय आहे. एका ज्योतिषाने एकाच वेळी दोन वेगवेगळ्या ठिकाणी वेगवेगळी मते नोंदविली आहेत. हे सरकार नियमाप्रमाणे आपली कारकीर्द पूर्ण करील असे मत त्याने एका ठिकाणी नोंदविले आहे, तर दुसऱ्या ठिकाणी गुळमुळीत लिखाण करून सरकार किती काळ सत्तेवर राहील याबाबत शंका व्यक्त केली आहे आता यातले कोणतेही भविष्य खरे ठरले तरी आपणच बरोबर होतो असे नेहमीप्रमाणे जाहिरात करून सांगण्यास तो मोकळाच आहे.

◻

---


कात्रजघाटापलीकडील भोर तालुक्यातील
काही खेडी -- कल्याण, कोंढणपूर, खेड, आर्वी,
शिवापूर, कुसगाव, वेळू, गौडदरा ...... इत्यादि
दिवस चिंब पावसाचे. पण या जनमत--
कौल--कामासाठी लोकांना भेटणे, मतांवरून
छेडणे हा एक चांगला अनुभव होता ......

-- जनमतकौल पत्रिकांचे काम
करणाऱ्या एका कार्यकर्त्याच्या अहवालातून

अहवाल पुढील अंकी

# पुढील अंक
# जनमतकौल विशेषांक


---

# 'संदर्भ : घटश्राद्ध'

अशोक प्रभाकर डांगे

प्रिय यमुनाक्का,

खूप दिवसांमागे इच्छेची बी आशेच्या भुईत रुजत घातली होती. आज अचानक ती बी अंकुरली आणि तुला भेटायची ती इच्छाही पूर्ण झाली. थिएटरबाहेरच्या आसमंतात जुलैतला एक दिवस ऊन–पावसाचे खेळ खेळण्यात दंग झाला होता, तर राहुलच्या भव्य पडद्यावर तुझ्या सुख–दुःखांच्या पाठशिवणीचा खेळ मांडला गेला होता.

यमुनाक्का, आयुष्य म्हणजे तरी काय ? सुख–दुःखांच्या ऊन्ह–पावसांचा खेळच की ! अग, आयुष्य म्हणजे अस्तित्वाच्या अळवावरचं पाणी. बघता बघता ओघळून जाणारं. आता, उभ्या विश्वाच्या पसाऱ्यात माणसाचं स्थान ते काय ? आणि त्याचं 'चार हात अस्तित्व तर केवढं नगण्य ! कोटयवधी वर्षांच्या सृष्टिक्रमात आपलं हे क्षणभंगुर आयुष्य कोणत्या मापानं म्हणून मोजायचं ? आयुष्याचं एक राहू दे. आपल्या अस्तित्वाचीच निशाणी म्हणून मिरविणाऱ्या ह्या देहाचं काय ? त्याचं मोल तर दीडदमडीच्या राखेएवढं नाही तर चार मूठ माती एवढंच की नाही ? हाडांच्या सापळयावर चढविलेल्या रक्तामांसालाच ना देह म्हणायचं ? यमुनाक्का, अग, ह्या देहाची जर अखेर मातीच व्हायची असेल तर त्या देहाला चिकटलेल्या उपभोगांची काय क्षिती ? आणि मग असल्या भोगांतून जन्माला येणारी सुख–दुःखं तरी काय कामाची ? मग अस्तित्व, शरीर, भोग, सुख, दुःख ही सगळी मांडणीच आपण मोडायला नको का ? आपलं अस्तित्व एक नगण्य असेल; पण हजारो वर्षांची भरभक्कम परंपरा लाभलेली आपली संस्कृती आणि धर्म त्यांचं नको मानायला ? ती परंपरागत पोक्त संस्कृती आणि पोक काढून चालणारा अनुभवी धर्म आपल्याला दुसरा कोणता सल्ला देतात ?

यमुनाक्का, वैराग्यात सुख मानणारी आपण माणसं. आपण का एरवीच्या सुख–दुःखांची तमा बाळगायची ? आता, वैधव्य हे काही वेगळेपण नव्हे. अग, जन्मल्याला मरण हे येणारच आणि मरणारी माणसं काय परकी तशीच आपली कोणी ना कोणी असायचीच. त्यातनं म्हाताऱ्यांच्या शेजेची सोय लावणाऱ्या आणि भगताकडून दुखण्यांवर उतारा घेणाऱ्या आपल्या पारंपारिक पण उदार समाजात हे एका परीनं उचितच नाही का ? आता सवाष्ण मरणाचं पुण्य प्रत्येकीच्याच वाटयाला थोडंच येणार आहे ? तरुण वयात नवरा गेल्यानं तुला चार–चौघींसारखंच वैधव्य आलं एवढंच ना ? आणि कुंकू पुसलं गेल्यानं तुला पुन्हा एकदा वडिलांच्या आसऱ्याला येऊन राहावं लागलं ना ? पण असं बिघडलं काय मोठं त्यानं ?

ते राहू दे यमुनाक्का, मी तर या पुढं जाऊन म्हणतो, तुझं घर काय, कुळ काय, जरा विचार केलायस मनाशी ? अगं, तुझा बाप उदाप्पा एक दशग्रंथी ब्राह्मण. धार्मिक पाठशाळा चालविणारा धर्मशील माणूस. वैदिक शिक्षण देऊन परंपरेचा पाठपुरावा करणारा. अशा मोठ्या माणसाची तू मुलगी ! मातीच्या का असेना पण वाड्यासारख्या त्या भल्या थोरल्या घरात काय कमी होतं तुला ? पाठशाळेत कितो तरी मुलं वेदाध्ययन करीत होती. तुझ्या वडिलांच्या ज्ञानाच्या सावलीला वाढत होती. त्यातनं तुझी आई नव्हती. मग सर्व पसाऱ्याची देखभाल करायला आणखी कोण व्यक्ती लायक होती ? आणि उदाप्पांसारख्या थोर माणसाची तू मुलगी ! त्यातनं विधवा. मग दुसरी सुखं–बिखं तुझ्या काय कामाची होती? खालच्या मानेनं पडेल ते काम करावं. आलेल्या दिवसाला आपला म्हणून स्वीकारावं. गेलेल्या दिवसाला न आठवता विसरून जावं. यात तुला कसली अडचण वाटत होती ? त्यातनं तुझा धर्म, संस्कृती, गोत, कुळ, शील सारंच तू विसरावंस. अग, ज्या परंपरेनं तुला मोठं केलं, त्या तेजस्वी आणि संयमी परंपरेकडे तू पाठ फिरवावीस ? यमुनाक्का, देहाची दर्पोक्ती विसरण्याऐवजी तू देहाकडेच दान मागू लागलीस ? आणि मूठभर शरीराच्या टीचभर सुखासाठी तू व्याकुळ झालीस. विधवेनं का कुठे सुख मागायची असतात ? आपल्या महान महाभारतातल्या कुंतीनं नाही का दुःखाचंच दान मागितलं होतं ? शिवाय दुसऱ्यासाठी देह झिजविण्यासारखं दुसरं श्रेष्ठ पुण्य तरी कोणतं ? भगवंतांच्या निष्काम कर्मयोगाची महती मी का तुला सांगावी?

पण यमुनाक्का, हे सगळं सगळं तू विसरलीस. देहाच्या दवण्यात दग्ध झालीस. स्वतःचाच तोल गमावून बसलीस आणि मग गावात त्याच एका सामान्य मास्तरामागं लागलीस. त्याला चोरून-मारून भेटू लागलीस. कधी पूर्वरात्री परसदारी चांदण्यात भेटलीस, कधी उत्तररात्री काळोख्या रानात आवर्जून जाऊन भेटलीस.तोही लेकाचा तरुण नि बिनलग्नाचा. तुझ्या निखळ, पारदर्शी. पाणीदार नजरेत गुंतला बिचारा ! बिचारा कसला? स्वार्थी लेकाचा! यमुनाक्का, तुझं दुःख, त्यावर त्याची भावनात्मक फुंकर, मग प्रेम. ह्या सगळ्या गोष्टी तद्दन ढोंग आहेत. आजच्या बाजारबुणग्यांच्या जगात भावनांची नकली नाणी चालतात नि शरीराचे बंदे रुपये खण–खण वाजतात. कलीयुगात दीड–दांडीचेच व्यवहार चालतात. मला वाटत होतं यमुनाक्का, निदान तू तरी असल्या व्यवहारात फसल्यावाचून राहशील. आपल्या त्या दैदीप्यमान परंपरेचा अर्थ ध्यानी घेशील आणि आपल्या धमन्यातून वहाणाऱ्या कुलीन रक्ताला जागशील; पण हे तुझ्यानं झालं नाही. एका टुकार माणसाला तू सरळ सरळ आपला सोन्यासारखा निष्पाप नि निष्कलंक देह देऊन बसलीस !

यमुनाक्का, तुझा घटका–दोन घटकांचा खेळ झाला आणि शेवटी शरीरच ते. ते एवढ्या-तेवढ्यावर थोडंच थांबतंय ? शिवाय तू तर विटाळ गेलेली विधवा थोडीच होतीस ? मग पापानं तरी का थांबावं ? म्हणजे मग ते पाप तुझ्याच पोटात वाढायला लागलं तर त्यात आश्चर्य ते कोणतं ? म्हणजेच एका दशग्रंथी ब्राह्मणाची विधवा पोर पोटोशी राहिली ! घटना तर घडली, परिणाम भोगणार कोण ? तू ? तू तर स्त्रीच ! घाबरलीस. आपलं पाप असं उघडं

झालेलं कोणत्या सभ्य स्त्रीला आवडलं असतं? मग मास्तर? तो तर पुरुषच! आणि इतिहासकाळापासूनच पुरुषाची जात ही महाघातकी! तो कशाला स्वतःवर उगाचच मरण ओढवून घेईल? बस्स! म्हणजे ते धर्मबाह्य पोर तुम्हा दोघांनाही अगदी एकमतानं नकोसं झालं. मग काय करणार? लागलीस गर्भ जिरवण्याच्या मार्गं; पण शेवटी पापच ते! अशा चिल्लर उपायांनी थोडंच जिरणार होतं?

मग काय? गावाबाहेर, गर्द रानात, पडक्या देवालयाच्या पायरीवर संकेतस्थळी तुमची भेट घडून आली. निर्दयच निघाला तो! सरळ म्हणतोय 'पाडून टाकू!' पण तुला मात्र तो उपाय नकोसा वाटला. त्याच्या मांडीवर डोकं टेकून तू रड रड रडलीस; पण तो व्यवहारी! त्यानं तुला पटवायचं ते पटवलंन.

मग यमुनाक्का, तू आत्मघाताला सिद्ध झालीस! एक पाप डोक्यावर होतंच. आता दुसऱ्या पापाचं ओझं घ्यायला निघालीस. रात्रभर सापाच्या बिळात हात घालून बसलीस; पण आयुष्याची दोरीच ताठ! तुझ्या देहाची नाव अशी–तशी पैलतीराला लागायची नव्हती हेच खरं. पाठशाळेतला नानी तुला शोधीत तिथवर आला आणि बळेच घरी घेऊन आला.

नानी–खरं तर केवढा कोवळा पोर! सात आठ वर्षांचा. उडाप्पांच्या पाठशाळेत शिकायला आलेला. सुरुवातीला नवखेपणानं वावरणारा. पुढं पुढं तुझ्या आयुष्याचाच एक अविभाज्य भाग होऊन गेला; पण यमुनाक्का, आत्मघात हा भ्याडांचा मार्ग; पण तोही तुला साधला नाही. मग सगळेच रस्ते रोखले गेले. तू निमूटपणे ठरल्या वेळी, ठरल्या जागी गर्भपातासाठी गेलीस, बरोबर नानी होताच! तुला उशीर झाल्यानं कावलेला मास्तर तिथं तुझीच वाट पहात बसला होता. तिथं आतल्या खोलीत एक गांवढळ ख्रिस्ती दाई, सगळ्या साहित्यानिशी तयारच राहिली होती.

यमुनाक्का, मग तुझ्या गर्भपाताचा तो भीषण सोहळा पार पाडला. तुझं वेदनांनी गुरासारखं ओरडणं कोवळ्या नानीला सहन करवेना. मग त्याला दुसऱ्या खोलीत कोंडून ठेवावं लागलं. बाहेरच्या मिट्ट अंधारात शेकोटी जळत होती आणि पिऊन तर्र् झालेली माणसं डफांच्या तालावर नाचत–गात होती आणि आतमध्ये अपुऱ्या उजेडात अनंत वेदनांनी तुझ्या देहाची तडफड चालली होती. यमुनाक्का, म्हणू नये पण फार मोठ्या पापाची किंमतही तितकीच मोठी असते हेच खरं! म्हणूनच तर प्रत्येक धर्म पुण्याची महती आवर्जून मांडीत नसेल ना?

यमुनाक्का, एका सच्चरित्र माणसाच्या मुलीचं काय हे अधःपतन? त्यातनं पाठशाळेतल्याच टारगट, वाढलेल्या, पोरांनीच तुझ्या, नि मास्तरांच्या भेटीगाठी चोरून–मारून पाहिल्या नि तुझ्या त्या पापाची गावभर दवंडी पिटविली, उडाप्पा तीर्थाला गेलेले, मग सारा गावच तुला जाब विचारायला चालून आला. तेव्हा मात्र तू भ्याडासारखी स्वतःलाच कोंडून घेऊन बसलीस! तुझ्याबरोबर होता फक्त नानी नावाचा पोर! मग उडाप्पांना घाईघाईनं बोलावून घेण्यात आलं. तुझ्यासारख्या मुलीच्या पापावर पांघरूण घालायला तो चारित्र्यवान धर्माभिमानी माणूस कसा काय धजावणार होता? काही झालं तरी तो परंपरा पाळणारा पुरुष होता. त्यानं गावाचं, चार-चौघांचं म्हणणं मानलं. तुझ्या नावानं घटश्राद्धाचा विधी उरकून घेतला. यमुनाक्का, आता तुला सारं काही संपलं. सासर तर तुटलंच होतं. आता माहेरही मेलं! जिवंतपणीच तुझ्या बापानं तुझ्या नावानं तर्पण केलं आणि केशवपन करून तुला घराबाहेर हाकललं! उडाप्पांसारख्या धर्मप्रेमी माणसापुढं तू नाही तरी दुसरा कोणता पर्याय ठेवला होतास?

यमुनाक्का, तुझ्या ह्या बदकर्मामुळं उडाप्पांची मात्र चांगलीच बेअदबी झाली. पालकमंडळी आपली मुलं त्यांच्या पाठशाळेतून काढून घेऊ लागली. बिचाऱ्या नानीलाही त्याचे वडील परत घेऊन निघाले. गावाबाहेर पडताना वडाच्या झाडाखाली तुझं अशुभ दर्शन त्याला झालं. तुझं नवं विकेशा रूप पाहून तो क्षणभर भेदरलाच; पण तरीही तुला हाका घालतच रडत रडत घरी गेला!

यमुनाक्का, माया ही गोष्ट अशीच मोहात पाडते. त्या अजाण पोराला तू का म्हणून माया लावावीस? त्याला कुशीत घेऊन का झोपावंस? आवर्जून खाऊ–पिऊ का घालावंस? म्हणून तर तो निष्पाप नि नवखा पोर तुझ्या आत्मीयतेत अडकत गेला. वेळोवेळी तुझी बाजू घेऊन सहाध्यायांशी भांडू-तंटू लागला. तुझे निरोप तुझ्या त्या भ्याड प्रियकराकडे नेऊ-आणू लागला. गर्भपाताच्या प्रसंगी तुझ्या अपार वेदना पाहून विव्हळला आणि रक्तानं थबथबलेल्या कपड्यांनी तिथून परतताना तुझ्याबरोबरच राहिला आणि अखेर वाळीत टाकलेल्या तुझा निरोप घेताना ओक्साबोक्शी रडला!

यमुनाक्का, माया ही गोष्ट जितकी वाईट तेवढाच मोहदेखील वाईट! एका अजाण पोराला तू माया दिलीस आणि एका जाणत्या पुरुषाच्या मोहात अडकलीस. शेवटी त्यानंही तुला दगा दिलाच की! तुझा पुरता गर्भपात व्हायच्या आतच, तुझ्या असह्य वेदनांनी भेदरून जाऊन तो भेकड माणूस पैसे मोजून पळाला! यमुनाक्का, ज्याच्यासाठी तू धर्म मोडीत काढलास, नीतीला तिलांजली दिलीस तो पुरुष तरी असा काय लायकीचा निघाला?

यमुनाक्का, धर्म साऱ्यांनाच सारखाच लागू पडतो. दशग्रंथी ब्राह्मणाच्या मुलीला तो काही माफ करीत नसतो. पापाला प्रायश्चित्त हे हवंच! आणि असं प्रायश्चित्त म्हणूनच घटश्राद्धासारखे विधी नेमले नाहीत का? यमुनाक्का, असे विधी नेकीनं पार पाडले तरच ना धर्म टिकेल? धर्म टिकला तर हजारो वर्षांची संस्कृतीही टिकेल आणि अशी संस्कृती टिकविली तरच ना तिचा वारसा आपल्याला मोठ्या अभिमानानं उद्याच्या जगाला गर्जून सांगता येईल?

यमुनाक्का, उडाप्पांना आता विसर! त्यांना काय, ह्या वयातही आपला समाज एखादी तरुण पत्नी मिळवून देईल आणि त्यांच्या कोसळलेल्या संसाराचा गाडा मार्गी लावून देईल. यमुनाक्का, यातनं आणखी एक विधवा जन्माला यायची शक्यता असली आणि ती पुन्हा एकदा तुझ्याच मार्गानं वाटचाल करण्याची शक्यता असली तरीही ते अटळ आहे आणि परंपरेचा आदर राखण्यासाठी अशा गोष्टींचा स्वीकार करणं आपणालाही अटळ आहे.

यमुनाक्का, आयुष्य खरंच क्षणभंगुर आहे. हा दोन घडीचा डाव कधीच संपून जाईल. घर काय, रान काय, कुठंही उघड्या आकाशाखाली तुला उरलेले चार-दोन दिवस ढकलता येतील. तुझं विकेशा रूप पाहून कुठलं पाप आपणहून तुझ्याकडं चालत येणार नाही, की तूदेखील पुन्हा अशा पापाकडे चालत जाणार नाहीस! यमुनाक्का, शरीर हे लहान असतं, भोग गौण असतात, पाप निषिद्ध असतं, धर्म मात्र त्या सर्वांहून मोठा असतो, महान असतो हेच तुझ्या ह्यानंतरच्या बेवारशी भटकंतीतून सिद्ध होईल!

तुझा
अशोक प्रभाकर

चित्रपट : घटश्राद्ध

दिग्दर्शक : गिरीश कासारवल्ली

## प्रसिद्धिपूर्व सवलत योजना

जगातल्या निरनिराळ्या क्रांत्या–उत्क्रांत्यांनी म्हणा किंवा सामाजिक, राजकीय इत्यादी स्तरांवर मांडलेल्या गणितांची उत्तरे सापडल्याच्या आनंदात असणाऱ्या विचारवंतांना तो चुकीची निघाल्याचा अनुभव येऊ लागल्यामुळे म्हणा, विचारवंत पुन्हा एकदा गांधी-टॉलस्टॉय यांसारख्या ऋषिवर्यांकडे वाट पुसायला जाणार असे मला वाटू लागले आहे. तुमच्या ग्रंथाचे म्हणून मला फार मोठे मोल वाटते.

**–पु. ल. देशपांडे**

महाराष्ट्र शासनाचा पुरस्कार आणि ‘ललित’ पारितोषिक
लाभलेल्या ग्रंथाची दुसरी आवृत्ती प्रसिद्ध होत आहे.

# टॉलस्टॉय–एक माणूस

## लेखिका : सौ. सुमती देवस्थळे

- ☐ प्रसिद्धीनंतरची या ग्रंथाची किंमत पंचावन्न रुपये.
- ☐ १५ सप्टेंबरपूर्वी नोंदणी केल्यास किंमत पस्तीस रुपये.
- ☐ रजि. पोस्टाने ग्रंथ हवा असल्यास तीन रुपये अधिक.
- ☐ रक्कम म. ऑ. किंवा ड्राफ्टने पाठवावी.
- ☐ व्ही. पी. पद्धत नाही.
- ☐ ग्रंथ २ ऑक्टोबर–गांधीजयंतीला प्रसिद्ध होत आहे.

**प्रसिद्धीपूर्व नोंदणी खालील ठिकाणी सुरू आहे.**

१ : राजहंस प्रकाशन । १०२५ सदाशिव पेठ । नागनाथ पाराजवळ । पुणे ३०.

२ : मॅजेस्टिक बुक स्टॉल । शनिपाराजवळ, पुणे । किंवा । गिरगाव नाका, मुंबई ४